संस्थापक : साने गुरुजी

साप्ताहिक
# साधना

शनिवार
२८ एप्रिल २०१२

मूल्य रु. १०

www.weeklysadhana.com




चिनी लोकांचा दावा आहे की साखरेचा शोध त्यांनीच लावला. पण ऐतिहासिक पुरावे असं सांगतात की उसापासून साखर तयार करण्याचं तंत्र शिकून घेण्यासाठी चीनच्या सम्राटाने काही कारागिरांना गंगेच्या खोऱ्यात पाठवलं होतं. इसवीसन पूर्व ५५० ते ४८६ या काळात पर्शियामध्ये दरायसचं साम्राज्य होतं. त्याने सिंधू खोऱ्यावर आक्रमण केलं तेव्हा त्याला बांबूसारख्या दिसणाऱ्या आणि मधमाशांच्या मदतीशिवाय मध देणाऱ्या वनस्पतीचा अर्थात गवताचा शोध लागला. या पर्शियन लोकांनी उसासोबतच साखर बनवण्याचं तंत्रही मायदेशात नेलं आणि तिथे साखर उद्योग सुरू केला. साखरेचा व्यापारही त्यांनी सुरू केला. त्यामुळे अल्पावधीत उसाची लागवड सिंधू नदीपासून आफ्रिकेत आणि काळ्या समुद्रापर्यंत सुरू झाली. – सुनील तांबे



Oil Painting : 1840 : Slave Market on the Kambia River, Coast of Africa

अल्पावधित **चौथी** आवृत्ती




गेल्या पन्नास वर्षांत वैद्यकीय क्षेत्रात झालेल्या **पेशा ते उद्योग** या बदलांचं हे सडेतोड विश्लेषण! आरोग्यव्यवस्थेत जे काही चाललं आहे त्यामुळे समाज उद्विग्न झाला आहे, **लोकांचा डॉक्टरांवरचा विश्वास उडत चालला आहे.** डॉक्टर्स आणि रुग्ण यांच्यातील **दरी वाढत चालली** आहे.

# पोस्टमॉर्टम्

आजच्या आरोग्य व्यवस्थेतील वास्तवाचं हे पोस्टमॉर्टम्!

## डॉ. रवी बापट । सुनीति जैन

पृष्ठ संख्या : २५२ किंमत : २३० रुपये

अवघ्या दोन महिन्यात **सहावी** आवृत्ती




विद्यार्थ्यांपासून गृहिणींपर्यंत, शिक्षक-पालकांपासून ते मानसशास्त्रज्ञांपर्यंत कुतूहल असणाऱ्या प्रत्येकाला मंत्रमुग्ध करून सोडेल अशी मानसशास्त्राची रंजक कहाणी

**– डॉ. प्रकाश आमटे**

पुस्तकाच्या सहाशे पानांतून घरबसल्या मेंदू आणि मानस या विश्वाची विमान यात्रा घडविणारे अच्युत गोडबोले यांचा प्रकल्प

**– डॉ. अभय बंग**

# म ना त

मानसशास्त्राची उत्कंठावर्धक रम्य सफर

## अच्युत गोडबोले

पृष्ठ संख्या : ६३२ किंमत : ३७५ रुपये

मनोविकास प्रकाशन

फ्लॅट नं. ३/ए, चौथा मजला, शक्ती टॉवर्स, ६७२ नारायण पेठ, लोखंडे तालीमजवळ, पुणे – ४११०३० दूरध्वनी : ०२०-६५२६२९५०
मुंबई : ९९६७०८१५२७ Email : manovikaspublication@gmail.com

# अनुक्रम


४
संपादकीय
**मार्क्स आणि देवपुत्र**

६
**मौनात पाखरांचे वनगीत शोधताना**
ज्ञानेश्वर मुळे

१०
**साखर चरित्र**
सुनील तांबे

१६
**टिकाल, पण उमटणार नाही!**
सुरेश द्वादशीवार

१८
**आणखी काही शाळा**
नामदेव माळी

२२
**कॅलक्युलेटेड मॅडनेस**
डॉ. दिलीप शिंदे

२६
**पोस्टमॉर्टम**
मालती किर्लोस्कर

२८
**प्रतिसाद**
**प्रवीण बर्दापूरकर, सुधीर निंबाळकर, विलास पंडित महाजन**

३०
**दत्ता ताम्हणे : शंभरीत पदार्पण**



**२८ एप्रिल २०१२**
**वर्ष ६४ / अंक : ३७**

- संपादक : **नरेंद्र दाभोलकर**
- कार्यकारी संपादक : **विनोद शिरसाठ**

- हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक नरेंद्र दाभोलकर यांनी महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ४ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ९२६ सदाशिव पेठ, बॅ.गाडगीळ रस्ता, पुणे ४११०३०.** येथे प्रकाशित केले.
- दूरध्वनी : **वर्गणी, पत्ता व अंकासंबंधी : (०२०) २४४५१७२४.**
संपादक : टेलिफॅक्स : (०२०) २४४५१७२४
Email : weeklysadhana@gmail.com ■ Web : www.weeklysadhana.com
- वार्षिक वर्गणी : व्यक्तीसाठी रु. ५००/-, संस्थांसाठी रु. ६००/-
साधना मीडिया सेंटर :- (०२०) २४४५९६३५
- (अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)
- मुखपृष्ठ व आतील चित्रे : गिरीश सहस्रबुद्धे, ■ अक्षर मांडणी : सुरेश माने

संपादकीय

# मार्क्स आणि देवपुत्र

सामाजिक बदलांची गती आणि त्यांची दिशा हा कोणत्याही काळात चर्चेचा, मतभिन्नतेचा आणि वादाचा विषय राहिला आहे. काही बदल परिस्थितीच्या रेट्यातून होतात; त्यात आर्थिक, तांत्रिक घटक विशेष प्रभावी ठरतात. काही बदल एकेका व्यक्तीने वा समूहाने चोखाळलेल्या वेगळ्या वाटेने जाण्याच्या हट्टातून होतात. तर काही बदल राजकीय इच्छाशक्तीतून होतात. या तीनही प्रकारच्या बदलांची गती व दिशा स्थल-कालानुसार वेगवेगळी असते, पण आजच्या जगात राजकीय इच्छाशक्तीतून घेतले गेलेले निर्णय सामाजिक बदलांना मोठी कलाटणी देणारे आणि अधिक दूरगामी परिणाम करणारे ठरतात. म्हणून तर राजकारणाकडून जनतेच्या अधिक अपेक्षा असतात आणि राजकीय क्षेत्रातील नेतृत्व टोकाच्या प्रेमाचे वा द्वेषाचे कारण ठरतात. त्यामुळेच आपल्या सभोवताली होत असलेले छोटे-मोठे राजकीय निर्णय अधिक डोळसपणे पाहण्याची व त्यांची चिकित्सा करण्याची गरज असते. पण काही वेळा अशा निर्णयामागील घटनाच इतक्या बोलक्या असतात की त्या घटनांच्या मागील व पुढील तपशील जरी नीट समजावून घेतले तरी त्या घटनांचा अन्वयार्थ लावणे, त्या निर्णयांचे महत्त्व लक्षात येणे आणि त्यामागील विचारांचा बोध घेणे सहज शक्य होते.

गेल्या आठवड्यात प.बंगाल व मध्य प्रदेश या राज्यांत अशा दोन छोट्या घटना घडल्या ज्यांच्यावर त्या त्या राज्यांतील राजकीय वर्तुळात बरीच उलट-सुलट चर्चा होत आहे, इंग्रजी प्रसारमाध्यमांनीही त्यांची दखल घेतली आहे. पण मराठी प्रसारमाध्यमांत मात्र त्यांचे प्रतिबिंब उमटलेले नाही. या दोन राज्यांतील शिक्षण क्षेत्रातील दोन छोटे निर्णय मोठ्या वादाचे विषय बनले आहेत. डाव्या आणि उजव्या राजकीय विचारसरणीच्या संदर्भातील हे निर्णय आहेत.

ममता बॅनर्जींनी पश्चिम बंगालमधील ३४ वर्षांची कम्युनिस्टांची राजवट १४ वर्षे अथक परिश्रम करून उलथवून टाकली त्याला अद्याप वर्ष झालेले नाही. पण या काळात त्यांनी जे काही धडाकेबाज निर्णय घेतले त्यात प.बंगालच्या विकासापेक्षा कम्युनिस्ट पक्षांची मुळे खोदून काढण्याकडेच अधिक लक्ष दिले आहे. गेल्या जानेवारी महिन्यात त्यांनी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणातील अभ्यासक्रमांची पुनर्रचना करणारी समिती नेमली. त्या समितीचा अहवाल या आठवड्यात आला आणि त्यात अकरावी-बारावीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमातून मार्क्स व एंगल्स यांचे धडे वगळण्याची शिफारस केली आहे, त्यावरून प.बंगालच्या राजकीय वर्तुळात वादळ उठले आहे. 'हा प्रकार म्हणजे इतिहासाचे पुनर्लेखन करण्याचा प्रयत्न आहे' अशी प्रतिक्रिया कम्युनिस्ट पक्षांतून येत आहे तर 'हा प्रकार म्हणजे इतिहासाच्या लेखनात समतोल साधण्याचा प्रयत्न आहे' अशी प्रतिक्रिया ममता बॅनर्जींच्या गोटातून दिली जात आहे. कम्युनिस्टांनी सलग ३४ वर्षांच्या राजवटीत प.बंगालमधील माध्यमिक व उच्च-माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात मार्क्स, लेनिन व बोल्शेविक क्रांती यांचे नको तितके अवडंबर माजवले आहे; असे स्पष्टच सांगून तृणमूलचे खासदार डेरेक ब्रायन म्हणतात, मार्क्सचे इतिहासातील महत्त्व मान्य आहे, पण महात्मा आणि मंडेला यांना बाजूला सारून ते बिंबवले जाणे आक्षेपार्ह आहे. वृंदा करात यांनी या संदर्भात, 'मुले व पालकच यांना उत्तर देतील' असे भाष्य केले आहे. या वादावर आपली बाजू मांडताना अभ्यासक्रम सुधारणा समितीचे अध्यक्ष अनिक मुजुमदार यांनी असे स्पष्टीकरण दिले आहे की, ''एखाद्या विचारसरणीला अतोनात महत्त्व दिले गेले असेल तर योग्य ती दुरुस्ती करायला हवी की नको? आधीच्या इतिहास विषयाच्या अभ्यासक्रमात कम्युनिस्ट चळवळींना जास्तच महत्त्व दिले गेले आहे. आता नवीन अभ्यासक्रमात ते प्रमाण कमी करून हरित क्रांती, चिपको आंदोलन, स्त्रियांच्या चळवळी यांचा अंतर्भाव करण्याची शिफारस केली आहे. अर्थात, १९ सदस्यांच्या समितीने सर्व विषयांसाठी मिळून केलेल्या ६९५ शिफारसींपैकी फक्त ९ शिफारसी इतिहास या विषयाशी संबंधित आहेत. साम्राज्यवादा संदर्भात मार्क्स-लेनिनचे विचार कालबाह्य झालेले नाहीत, त्यामुळे ते ठेवले आहेत आणि रशियन राज्यक्रांती वगळली असली तरी चिनी क्रांतीचा नव्याने समावेश केलेला आहे. त्यामुळे पक्षपाताचा आरोप चुकीचा आहे.'' त्याही पुढे जाऊन ते म्हणतात की, वसाहतवाद, पर्यावरण असे

स्थापण्या
समता शांती
ठेवुनी शुद्ध
साधनां
करिती
साधना
त्यांना ठेवो
उत्स्फूर्त
साधना







विषय; बांगलादेश, श्रीलंका असे देश आणि मंडेला-गांधी असे नेते यांचा अंतर्भाव करायचा असेल तर पूर्वीच्या अभ्यासक्रमातून काही भाग वगळावा लागणार आणि त्यासाठी मार्क्स व कम्युनिस्ट चळवळींचा ओव्हरडोस झाला असेल तर तो कमी करावा लागणार. या वादासंदर्भात ममता बॅनर्जी यांनी 'मार्क्स व लेनिन अस्पृश्य नाहीत' असे म्हटले आहे तर सोमनाथ चटर्जी यांनी 'हा प्रकार अनावश्यक व दुर्दैवी' असल्याचे म्हटले आहे. या शिफारसी करणारा अहवाल उच्च शिक्षण मंडळाकडे गेला आहे आणि या आठवड्यात त्यावर निर्णय अपेक्षित आहे.

दुसरी वादग्रस्त घटना वा निर्णय मध्य प्रदेशातील आहे. मध्यप्रदेशमध्ये गेल्या नऊ वर्षांपासून भाजप सरकार आहे. भाजपची सत्ता आली त्या त्या राज्यांत शिक्षणाचे भगवेकरण करण्याचा प्रयत्न यापूर्वीही झालेला आहे आणि त्यावर त्या त्या वेळी मोठे वादळ उठले आहे. आता मध्य प्रदेशामधील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांना 'देवपुत्र' हे हिंदी भाषेतील मासिक पुढील १५ वर्षांसाठी देता येईल यासाठी सर्व शिक्षा अभियानाच्या अंतर्गत १३ कोटी २६ लाख रुपयांचा चेक शिवराजसिंह चौहान यांच्या सरकारने एकरकमी दिला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारसरणी प्रसृत करणाऱ्या कृष्णकुमार यांच्या 'सरस्वती शिशु मंदिर' या ट्रस्टमार्फत हे मासिक गेल्या ३५ वर्षांपासून चालवले जाते. या मासिकातून राष्ट्रवादी विचार मांडताना भारताच्या सांस्कृतिक वारशाचे उदात्तीकरण आणि पाश्चात्त्य संस्कृतीची टिंगल-टवाळी केलेली असती. याच मासिकाने पूर्वी सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांच्यावर विशेषांक काढला होता, मागील महिन्यात हिंदू वर्ष विशेषांक काढला होता आणि चालू अंकात संघाचे संस्थापक हेडगेवार यांच्यावर लेख आहे. म्हणून मध्यप्रदेशातील काँग्रेस पक्षाने हा तर 'स्लो पॉइझनिंग'चा प्रकार आहे अशी प्रतिक्रिया दिली आहे. सध्या 'देवपुत्र'च्या सव्वा लाखापेक्षा अधिक प्रतींची विक्री होते आणि आता मध्य प्रदेशातील ८३ हजार शाळांमध्ये देवपुत्रच्या प्रत्येक अंकाच्या दोन प्रती जाणार आहेत. म्हणजे पावणेचार लाख प्रतींचा खप 'देवपुत्र'चा होणार आहे. ''शाळांमधून हा अंक जाणार आहे तर त्याचे स्वरूप बदलणार का'' असा प्रश्न विचारला गेला तेव्हा 'देवपुत्र'चे व्यवस्थापकीय संपादक विकास दवे यांनी तशी गरज नसल्याचे स्पष्टच सांगितले आहे. त्यामुळे हा प्रकार म्हणजे संघाची विचारसरणी पेरण्याचे कटकारस्थान असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रवक्ते प्रमोद गुगलीचा यांनी केला आहे, तर या निर्णयात बदल होणार नाही असे शिक्षणमंत्री अर्चना चिटणीस यांनी म्हटले आहे. पुढील वर्षी मध्य प्रदेशात विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत, त्या निवडणुकीनंतर भाजपची सत्ता येईल की नाही अशी शंका असल्यामुळेच आणखी १५ वर्षांची रक्कम 'देवपुत्र'ला आताच देऊन टाकण्याचा निर्णय झाला आहे. त्यामुळे हा एक प्रकारचा भ्रष्टाचाराच आहे, असे म्हणून आगामी विधानसभा निवडणुकीत हा एक प्रचाराचा मुद्दा बनवला जाणार असल्याचेही काँग्रेसने सूचीत केले आहे.

थोडक्यात काय तर, ममता बॅनर्जींना आपली राजवट टिकविण्यासाठी आतापासूनच भावी पिढ्यांमध्ये मार्क्सचा विचार अती होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक वाटते, आणि भाजपला मध्य प्रदेशातील सत्ता टिकविण्यासाठी किंवा भविष्यात पुन्हा मिळविण्यासाठी संघाच्या विचारांची पेरणी भावी पिढ्यांमध्ये आतापासूनच करण्याची गरज वाटते.

या पार्श्वभूमीवर, जाती-धर्मनिरपेक्षतेचा व नि:पक्ष उदारमतवादाचा पुरस्कार करणारा आणि सम्यक् व सकारात्मक दृष्टिकोन देणारा साधना बालकुमार दिवाळी अंक तयार करणे आणि त्याच्या लाखो प्रती मुलांपर्यंत पोहोचविणे याची गरज जास्तच ठळकपणे अधोरेखित होते आहे.

✷

कथानिबंध : ५

ज्ञानेश्वर मुळे

# मौनात पाखरांचे वनगीत शोधताना

मी काय सांगतो हे साधनाला कसं कळावं? दिल्लीत ती कार्यालयात अधिकारी असते तेव्हा ज्यांचं काम असतं अशाच लोकांना ती भेटते. कामाशिवाय फालतू बडबड करणाऱ्यांना ती थांबवते आणि गरज वाटली तर त्यांना पळवून लावते. अगदी जवळचे काही नातेवाईक व मित्र सोडल्यास तिला आपला असा 'गाव' किंवा 'समाज' नाही. पण माझ्या गावाची माझ्यावर मालकी आहे ही संकल्पना तिला कशी समजावून सांगावी? शिवाय, मी गेली चाळीस वर्षे बाहेर असलो तरी मी या गावाला पक्का बांधला गेलो आहे. एक गाव जेव्हा एखाद्याचा पाठलाग सतत करतं; मागोवा ठेवतं तेव्हा त्या व्यक्तीच्या आणि गावाच्या नातेसंबंधांचं वर्णन कसं करावं? आमचा सततचा संवाद- उपस्थितीतला आणि अनुपस्थितीतला- आमचं जीवनसत्त्व आहे हे इंग्रजीत किंवा हिंदीत मी कसं समजावू शकेन.

साधनाने मला विचारले, 'हे लोक काही न बोलता इतका वेळ का बसलेत?' मी विचारले, 'कोण लोक?'. 'हेच, बाहेर सोप्यात बसलेले लोक. मी पाहात्येय, काही लोक तासतासभर बसलेत तेही न बोलता. आणि तूही त्यांच्यामध्ये बसलेला असतोस शांतपणे.' माझ्या लक्षात आलं थोडंसं. ती आमच्या घरात मला भेटायला आलेल्या गावकऱ्यांविषयी बोलत होती. मी म्हणालो, 'गप्प कुठे बसलोत आम्ही? अधूनमधून बोलतोच आहोत'. 'अधूनमधून म्हणजे?' तिने विचारलं, 'जेव्हा कुणी नवीन माणूस येतो तेव्हा कधी आला? कसं काय? असे प्रश्न होतात, त्याची उत्तरं झाली की सगळं शांत. तू वर्तमानपत्र वाचतोस किंवा पुस्तक. कधी कधी फोनवर बोलतोस आणि गावकरी मात्र बसलेले असतात. काही लोक बसून थकले की हळूच उठतात. कुणी 'जातो' एवढंच म्हणतो. पण काही लोक तर न बोलताच निघून जातात, आणि काही नवीन येतात ते पुन्हा न बोलता बसून राहतात. हा प्रकार काय आहे?'

मला ती काय म्हणते आहे ते लक्षात आलं. ती शहरातून अशा प्रकारे खेड्यातल्या घराचा अनुभव पहिल्यांदाच घेत होती. शहरात न कळवता, वेळ न घेता येणारं फारसं कुणी नसतं. नातेवाईकसुद्धा फोन न करता येण्याची शक्यता अजिबात नसते. आलेला मित्र असो वा नातेवाईक, तो एक 'वेळापत्रक' घेऊन येत असतो. म्हणजे तो येतो तेव्हा, तो कशासाठी (उदा. भोजनासाठी, मुलीच्या लग्नाचे आमंत्रण देण्यासाठी, नातवाच्या नामकरणाला बोलावण्यासाठी किंवा मुलाच्या नोकरीबाबत चर्चा करण्यासाठी वगैरे) येणार, किती काळ थांबणार (उदा. नोकरीची चर्चा अर्धा तास, निमंत्रण पाच ते वीस मिनिटे, जेवण दोन-अडीच तास) व साधारणत: काय चर्चा करणार, याची चौकट घेऊन येतो. थोडक्यात तो येतो तेव्हा किती मिनिटांसाठी ते ठरवून येतो. यात कारण नसताना एक अजब व्यावहारिकता येते. ती अपरिहार्यही असते. कारण त्या येण्या-जाण्यात स्वत:च्या वेळापत्रकाचं प्रतिबिंब असतं. शहरातल्या माणसांना सतत कुठंतरी जावं किंवा कुठून तरी यावं लागतं. बाईसाहेब कुठं गेल्यात? किट्टी पार्टीला. मुलगी? भरतनाट्यम् शिकतेय. साहेब? क्लबला गेलेत. कुणीतरी कुणासाठीतरी भोजनाचं आयोजन केलंय. तिथं ओनजीसीचे सीएमडी भेटतील, त्यांच्याशी पुढच्या नियुक्तीसंबंधी चर्चा करायची. कारण ते 'नैसर्गिक वायू' मंत्र्यांना ओळखतात. थोडक्यात शहरात प्रयोजन असते, नियोजन असते, संयोजन आयोजन असते. गावात 'योजक: तत्र दुर्लभ:' असे नियोजनशून्य जीवन असते. शहरात आणि गाव नावाच्या संकल्पनेत हाच मुख्य फरक आहे.

साधनाला नेमकं कसं समजावून सांगावं की, माझी आणि माझ्या गावकऱ्यांची रीतच अशी आहे. त्या वेळी तिथं मला भेटायला येणाऱ्यांचा आणि माझा एक अनोखा संवाद सुरू असतो. तिथं कुणाकडेच वेळापत्रक नसतं. ती माणसं पक्ष्यासारखी येतात, काही काळ थांबतात, तो काही काळ म्हणजे किती तो ते आपल्या सवडीनं ठरवतात आणि मग निरोप घेतला न घेतला असं करून उडून जातात. पक्षी जाताना कधी गुडबाय, सी यू अगेन वगैरे थोडंच बोलतात? ते चाललेत हे कळतं आणि वास्तवात भेटतील न भेटतील,

पण पुन्हा येतील तेव्हा असंच निरागस गोजिरवाणं भेटतील असं आश्वासन त्यांच्या जाण्यातसुद्धा असतं.

मी साधनाला सांगितलं, 'आमचं गप्प गप्प बसणंही बोलणंच असतं. मी पुस्तक वाचत असलो आणि ते तिथं काही न करता दात टोकरत, आपसात बोलत किंवा क्वचित पेंगतही बसलेले असले तरी आमचा संवाद सुरू असतो. तुला हा प्रकार कळणं शक्य नाही. कारण या भेटीला येणाऱ्या कुणालाच कोणतीच चौकट नाही. कोणतेही प्रयोजन नाही. ते फक्त भेटीला आलेत. बोलण्याचं बंधन घेऊन नाही. ज्या क्षणी आमची दृष्टभेट होते, आम्ही एकमेकांना मिठी मारतो, फक्त नमस्कार करतो किंवा एकमेकांच्या पाया पडतो तो क्षण कृतार्थ असतो. केवळ त्या क्षणासाठी ते तिथं असतात, आणि मीही हजारो मैलांचं अंतर कापून वारंवार गावाच्या दिशेनं धावतो.' 'पण ते भेट झाली की जाऊ शकतात. बसून का राहतात?'

'बसून राहतात, कारण उठण्याचं बंधन नाही. दुसरं, इतर कुठंही ते त्या क्षणी गेले तरी बसूनच राहणार असतात. पण मला वाटतं ते बसतात त्याचं कारण याहून वेगळं असावं. माझ्या दोन भेटींमधलं अंतर काही महिन्यांचं असतं. ते बसतात तेव्हा ते अंतर भरून काढतात. मलाही ते आवडतं. एखादी गोष्ट अचानक मनात आली तर विचारता येते, पण हे अंतर भरून काढणं, या कालावधीत मी कसा बदललो, किती बदललो, माझ्या जीवनात आणखी काय झालं या सगळ्या माहितीच्या अभावाचं अंतर ते बसल्या बसल्या ओलांडतात. त्यांची मूक भाषा मला कळते आणि माझी त्यांना.'



मी काय सांगतो हे साधनाला कसं कळावं? दिल्लीत ती कार्यालयात अधिकारी असते तेव्हा ज्यांचं काम असतं अशाच लोकांना ती भेटते. कामाशिवाय फालतू बडबड करणाऱ्यांना ती थांबवते आणि गरज वाटली तर त्यांना पळवून लावते. अगदी

जवळचे काही नातेवाईक व मित्र सोडल्यास तिला आपला असा 'गाव' किंवा 'समाज' नाही. पण माझ्या गावाची माझ्यावर मालकी आहे ही संकल्पना तिला कशी समजावून सांगावी? शिवाय, मी गेली चाळीस वर्षे बाहेर असलो तरी मी या गावाला पक्का बांधला गेलो आहे. एक गाव जेव्हा एखाद्याचा पाठलाग सतत करतं; मागोवा ठेवतं तेव्हा त्या व्यक्तीच्या आणि गावाच्या नातेसंबंधांचं वर्णन कसं करावं? आमचा सततचा संवाद- उपस्थितीतला आणि अनुपस्थितीतला- आमचं जीवनसत्त्व आहे हे इंग्रजीत किंवा हिंदीत मी कसं समजावू शकेन. "Our continuous engagement- face to face and in absentia- is our vital life line" असं मी सांगावं का?

विशेष म्हणजे आमच्या घरानं कमीतकमी दोन-तीन पिढ्या तरी आजूबाजूच्या समाजाला चर्चामंच उपलब्ध करून दिला आहे. तिथं माणसांचं मोहोळ मी सतत बघत आलो आहे. आमचा पिढीजात व्यवसाय शिंपीकामाचा. आजोबा, वडील, काका, चुलत भाऊ सर्वांना मी शिवणयंत्रावर पाहिले आहे. शिंप्याचे घर आपोआप एक सामाजिक केंद्र बनते. माझे आजोबा, काका, वडील उच्चशिक्षित नसले तरी उदारमतवादी होते. त्यामुळे आमच्या सोप्यातल्या मोकळ्या जागेत वेगवेगळ्या विषयांवर चर्चा व्हायच्या. त्यात निवडणुकांपासून नेहरूंपर्यंत व अस्पृश्यतेपासून सिनेसृष्टीपर्यंत सगळे विषय यायचे. जोपर्यंत दुकान उघडे (त्या काळात घरं किंवा दुकानं फक्त रात्रीच बंद व्हायची) तोपर्यंत तो खुला 'मंच' सुरूच असे. या दरम्यान काही लोक तिथेच आडवे होत असत. काही लोक फक्त 'गप्प' बसण्यासाठीच नियमितपणे येत असत. माझ्या बालपणात आमचे दुकान म्हणजे समाजमनाचे पुस्तक होते. मी बहुसंख्य गावकऱ्यांना ओळखतो आणि तेही मला ओळखतात याचं कारण तो 'मंच' निर्मित अनुबंध आम्ही टिकवून ठेवला आहे.

दरम्यान खूप बदल झालेत. गाव बदलतोय झपाट्याने. एका बाजूला राजकारणाचे आक्रमण तर दुसरीकडे जातीच्या आधारावरील ध्रुवीकरण, तिसरीकडे भोगवाद आणि चंगळवादाचे खुलेआम प्रदर्शन यांच्या प्रभावाने पारंपरिक सामाजिक व सांस्कृतिक साचा पूर्णपणे मोडकळीला आला आहे. आमच्या विशाल एकत्रित कुटुंबातून अनेक छोटे घटक निर्माण झाले. आम्ही मुलं वेगवेगळ्या दिशांनी पांगलो. मागे राहिलेल्यांनी आपापले संसार थाटले. या घाईगर्दीत ते जुने दुकान (जिथले तादुक कुठल्या तरी बाजूने फाटलेले असे) गायब झाले आणि तिथले 'अर्ग्युमेंटेटिव्ह इंडियन'सुद्धा.

आताचे आमचे घर रस्त्यापासून थोडे आत आहे. तिथं फक्त आई एकटी राहते. तिच्या वयाच्या तिच्या काही मैत्रिणींची आणि तिची दररोज गाठभेटही होते आणि त्यांचा छोटा मेळा भरतो. पण मी गेलो की पुन्हा एकदा तो खुला मंच भरतो. बाकावर, कॉटवर खाली फरशीवर असे जागा सापडेल तसे लोक बसतात. काहीजण बाहेर खिडकीजवळच उभे राहतात. कधी कधी मी सकाळी उठायच्या आधीच ते येऊन बसतात. मी उठेपर्यंत वाट बघतात. अधूनमधून बातचीतही होते. काहींना कुतूहल असते. 'मायावती प्रधानमंत्री होणार का? मालदीव कधी बुडणार आहे? आपल्या देशात हुकूमशाही किंवा लष्करी राजवट का येत नाही?' वगैरे. अनेकांचा समज असतो की, माझे दिल्लीत खूप वजन आहे. ते सर्वोच्च न्यायालयातील खटल्यांपासून पेट्रोल पंपाच्या परवान्यापर्यंत अनेक कामांसाठी माझी मदत मागतात. पण येणारे बहुसंख्य लोक फक्त भेटण्यासाठी येतात. 'भेटीलागी जीवा' ही आस हेच साधन आणि साध्य. त्यांचं तिथं बसणं म्हणजे एक नि:शब्द कॅनवास असतो. त्यावर कधी शब्दांचे ठिपके, वाक्यांचे कुंचले आणि संवादाचे रंग पसरतात पण कॅनवासवरची मोकळी जागा अव्याप्त अवकाश- हेच तिथले खरे चित्र असते. तिथे आवाजापेक्षा ध्वनिशून्यतेला उजवे स्थान असते. माणसाला सतत बोलण्याची, नाचण्याची, प्रदर्शनाची, बातम्यांची, धावण्याची किंवा प्रयोजनाची आवश्यकता नाही असा त्या अवकाशाचा अर्थ असतो.

पंचेंद्रियांना सुखावणारं मनाला चेतवणारं बुद्धी आणि अहंकार यांच्यासाठी सातत्यानं काहीतरी उत्तेजक रसद पुरवणं आवश्यक आहे असं वाटणाऱ्या आजच्या जगात तो मोकळा अवकाश मला 'थोडके म्हणजे खूप' याची जाणीव करून देतो. त्या मोकळ्या अवकाशातून दिसणाऱ्या छटा, आयाम, रंग या सर्वांना खूप खोल अर्थ प्राप्त होतो. अगदी जपानी लोकांच्या बैठकीच्या खोलीसारखा. तिथं कमीत कमी सामान असतं. भिंतीवरती फोटो, कलाकृती, चित्र, टीव्ही यांची जागेसाठी मारामारी नसते. चषक, ताजमहाल कुतुबमिनार यांच्या प्रतिकृती, प्रशस्तिपत्रके यांच्या गर्दीत गुदमरलेली कपाटे नसतात. भिंती मोकळ्या, बसायला खुर्च्याऐवजी चटया आणि कोणत्याही लक्षवेधी भडक वस्तूंचा अभाव. फक्त या अवकाशाचा अर्थ अधिक गडद करण्यासाठी हलकासा उंचवटा असणारा एक कोपरा व तिथं शाईनं चितारलेलं त्या त्या ऋतूचं दर्शन घडवणारं चित्र. चित्रासोबत काही कवितेच्या ओळी किंवा एखादी हायकू.

या समृद्ध कोपऱ्याला ते 'तोकोनोमा' म्हणतात आणि घरी आलेल्या अतिथीला तोकोनोमाजवळची जागा बसायला देतात. तिथं काहीही न सांगता खूप सांगण्यातील अर्थगर्भ सूचकता आहे. अबोली हाच बोलीचा आविष्कार आहे. कमीतकमी आणि संयत संवादातला आनंद आहे. त्यातही हातात साकेच्या कपूकला (छोटा प्याला) किंवा बिनकानाचा चहाचा कप आला तर परमानंद. पंचेंद्रियांना हळुवार स्पर्श करणारा, बेधडक चेतवून टाकणारा नव्हे.

शांतता किंवा 'लो व्हॉल्यूम लाइफस्टाईल' हा एकेकाळी भारतीय जीवनाचा कणा होता. ध्यान, मौन, चिंतन, योग, निर्वाण, निवृत्ती, आतला आवाज, वानप्रस्थ, संन्यास, स्थितप्रज्ञ या सगळ्या संज्ञा शांतीचे अर्थपूर्ण आयाम दर्शवतात. मनुष्यसंस्कृतीत वाणीचा प्रवेश होण्याआधी फक्त शांतीचा ध्वनी होता. शांती म्हणजे प्रकृती किंवा निसर्ग आणि आवाज म्हणजे संस्कृती. आता आवाजाची संस्कृती

कलकलाट करते आहे. आजच्या वृत्तपत्रात चीनमधील १७ वर्षांच्या युवकाने 'आयफोन' खरीदण्यासाठी आपला एक मूत्रपिंड विकल्याची खबर आहे. खुल्या अवकाशाची आणि नि:शब्दतेतील सौंदर्याची सरेआम कत्तल यांचा प्रारंभ झाला आहे.

मला रात्र आवडते, कारण रात्रीचे स्वरूप अजूनही निसर्गाच्या म्हणजेच शांततेच्या जवळ आहे. दिवसाचा सगळा आवाज जर रात्रीही ऐकू येऊ लागला (आणि तो आता ऐकू येऊ लागलाय) तर जीवनाचे उरलेसुरले संतुलन नष्ट होईल. रात्रीला स्वत:चा 'आवाज' असतो, पण तो संपूर्ण नैसर्गिक असतो. दिवसाचा आवाज संस्कृतीला वाहिलेला असतो. मी दक्षिणेच्या 'सायलेंट व्हॅली'त दोन रात्री घालवल्या, तेव्हा रात्रीचे व्यक्तिमत्त्व अनुभवले. रातकिड्यांचा आवाज, निर्झरांची खळखळ, झाडांच्या अंगाशी धसमुसळेपणा करणारा वारा, मध्येच त्यांची शीळ, पावसाच्या पानांवर पडणाऱ्या टपटपीतील वेगवेगळ्या छटा, खिडकीतून आत येणाऱ्या हवेत विरघळलेला जंगलांचा गंध... आणि या सगळ्यांना कवेत सामावून घेणारी 'शांत' दरी. अशा ठिकाणी लागणाऱ्या झोपेलाही एक गूढरम्य रंग असतो.

माणसाच्या आजपर्यंतच्या विकासातील तिसऱ्या आणि महत्त्वाच्या वळणावर आपण आहोत. पहिल्या टप्प्यात तो निसर्गाचा भाग म्हणून अस्तित्वात होता. दुसऱ्या टप्प्यात तो निसर्गापासून वेगळा झाला, पण शेती करत करत तो निसर्गाशी सहअस्तित्व राखून होता. तिसऱ्या टप्प्यात क्रमाक्रमाने वैज्ञानिक क्रांती, औद्योगिक क्रांती, माहिती-तंत्रज्ञान क्रांती (याशिवाय हरित क्रांतीपासून धवल क्रांती वगैरे) या सर्व क्रांत्यांनी माणसाला निसर्गावरती मर्यादित का होईना आधिपत्य दिले. आता 'निसर्गा'चा मृत्यू झालेला आहे आणि तो जर झालेला नसेल तर त्याचे जगणे-मरणे माणसावर अवलंबून आहे. क्रांत्या स्वभावानेच अधिक कार्यप्रवण असतात. त्या मानवी संस्कृतीच्या प्रतीक आहेत, निसर्गाच्या किंवा शांततेच्या नव्हेत. आज जगातील ९० टक्के झाडंझुडपं माणसं सक्रिय असणाऱ्या क्षेत्रात आहेत. हजारो वनस्पतींच्या प्राणी, पक्षी आणि जलचरांच्या जाती दर वर्षी नष्ट होताहेत. माणसाने स्वत:कडे आणि उरल्यासुरल्या निसर्गाकडे थोडं अंतर्मुख होऊन पाहिलं तर या विनाशाचं चित्र त्याला स्पष्ट दिसेल. अर्थात् अंतर्मुख व्हायचं तर थोडं शांतही व्हावं लागेल. पण शांतता येणार कुठून?

व्हाय धिस कोलावरी डी? हा गोंधळ कशासाठी म्हणून विचारणाऱ्या गाण्यालासुद्धा पहिल्या काही आठवड्यांत तीन कोटी लोकांनी ऐकले म्हणे! आपली डोकी आता ढगात आहेत असा निष्कर्ष 'टाइम' या साप्ताहिकाने १२ मार्चच्या अंकात काढला आहे. कारण दररोज सर्वसाधारण 'अमेरिकन' व्यक्ती बारा तास माहिती शोषून घेण्यात घालवते, साधारण एक लाख शब्द आणि ३४ गिगाबाईट्स दूरची माहिती त्यांचा मेंदू खातो. आपणही याच संस्कृतीच्या मागे लागलो आहोत. 'टाइम'च्या या अंकातील तीन निष्कर्ष मनोज्ञ आहेत. पहिला- माणूस वाढत्या गतीनं स्मरणाचं आणि माहिती जपण्याचं काम सर्व इंजिन्स आणि स्मार्ट फोनवर सोपवतो. दुसरा- जेव्हा आपल्याला माहिती अशा प्रकारे कुठंतरी (स्मार्ट फोन वगैरेंवर) उपलब्ध आहे याची खात्री असते तेव्हा ती चांगल्या पद्धतीनं लक्षात ठेवू शकत नाही. तिसरा- माहिती हवी तेव्हा मिळेल अशी खात्री असते तेव्हा त्या माहितीपेक्षा ती कुठे ठेवलीय (डिस्क, मेमरी चिप) एवढे लक्षात ठेवण्याकडे कल असतो. माणसाला आता स्वत:ला 'चार्ज्ड' ठेवण्याऐवजी स्मार्टफोन चार्जड ठेवणं महत्त्वाचं वाटतंय. माणसाचं मन सुपरमाइंड होण्याच्या प्रक्रियेत आहे. निसर्गापासून संपूर्णपणे वेगळे होत असल्याची ही तुतारी आहे.

अनादी कालापासून लोक मन:शांतीसाठी हिमालयात जातात. पण ते देवाच्या शोधात नव्हे, दिव्याच्या शोधात. बुद्ध अनेक वर्षे चिंतनात दूरवर गेला. तिथं त्याला जीवनाची दृष्टी मिळाली. माणसं समुद्रकिनाऱ्यावर तासन्तास बसतात, गिरि-कंदरात विश्रांतीसाठी जातात, वाळवंटातील वाळूत तंबू टाकून चांदण्याखाली रात्र घालवतात. सगळ्यांचा उद्देश एकच असतो मौनाची पाखरं शोधणं. काही काळासाठी 'निष्क्रिय', 'निष्काम' होणं. स्वत: आणि निसर्ग यांच्या संबंधांचं जाळं तपासणं. ब्रह्म अनुभवणं. मौनातील पाखरांचं वनगीत शोधणं.

हा अवकाश श्वासोच्छ्वासाइतकाच माणसाला आवश्यक आहे. मालदीवमधली पर्यटन रिसॉर्ट्स् स्वत:ची जाहिरात करताना 'काहीही न करण्याची कला विकसित करण्याची संधी' देऊ करतात (त्यासाठी एका रात्रीचे हजार-बाराशे डॉलर्स घेतात), पण एकही पैसा खर्च न करता मला गावात ही कला साध्य झाली आहे. आमच्यात शब्दांच्या अडथळ्यांशिवाय संवाद सुरू असतो. सगळे गावकरी आपापल्या घरी जातात तेव्हा, मी आणि आई दोघेच असताना या संवादाचा परमानंद अनुभवतो. ती भाजी निवडत असते, मी पुस्तक वाचत असतो किंवा तात्यांच्या हस्तलिखितांकडे नव्याने बघत असतो. बोलण्याचा, सांगण्याचा अट्टाहास नसतो. मधूनच ती 'पोरास्नी जरा हिकडं यिवून जायला सांग की रे', 'पोरगा आता कुठल्या वर्साला हाय?', 'तिकडं लई दिवस झालं, आता दिल्लीकडं जवळ ये' असं एखादं वाक्य स्वत:शीच बोलत असल्यासारखं बोलते. मीही 'हां', 'ना' असं काहीतरी बोलतो किंवा तिच्याकडे पाहून फक्त मंद स्मित करतो. आमच्या दोघांमधली नाळ कधीच तुटणार नाही याची ती ग्वाही असते.

गंमत म्हणजे साधनालाही या शांततेतील सौंदर्य आणि नि:शब्दतेतील शब्दार्थ हळूहळू कळू लागलेत!

**ज्ञानेश्वर मुळे**
डी-१/६६, भारतीनगर, नवी दिल्ली ११०००३.
dmulay@hotmail.com
*(लेखक, मालदीवमध्ये भारताचे उच्चायुक्त आहेत.)*

सुनील तांबे

# साखर चरित्र

**इसवीसन १७०० पर्यंत साखर आणि गुलामी हे युरोपमध्ये समानअर्थी शब्द बनले. त्यामुळे गुलामगिरी नष्ट करू पाहणारे साखरेवर बहिष्कार घालण्याच्या गोष्टी करू लागले. एका निग्रोची कैफियत या कवितेत विल्यम कॉपर या कवीने नेमका हाच प्रश्न विचारला..**

***आम्ही ज्यासाठी राबतो ती वनस्पती***
***निसर्गाने निर्माणच का केली ?***
***श्वासांनी त्याला वारा घालावा***
***लागतोय, अश्रूंनी सिंचावं लागतंय***
***आमच्या घामांनी मातीला वस्त्र***
***चढवावं लागतंय***
***हे दगडी हृदयाच्या मालका***
***आनंदाने लोळतो आहेस***
***विचार कर किती लोकांनी आपल्या***
***पाठी मोडायच्या***
***तुझ्या उसातल्या साखरेसाठी***

**इंग्लंडातील या असंतोषाची दखल घेऊन ईस्ट इंडिया कंपनीने आपल्या साखरेच्या जाहिरातीत बदल केला. ईस्ट इंडिया साखर : गुलामांनी बनवलेली नाही. कंपनीने गुलामांना कामाला जुंपलेलं नव्हतं हे खरं, पण मळ्यावर आणि कारखान्यात काम करणाऱ्या मजुरांना तुटपुंज्या मजुरीवर राबवून घेतलं जात होतं.**

साखर कांडल्यावर उखळ पांढरं होतं. साखरेला उत्तम भाव मिळतो त्यामुळे शेतकऱ्याचं नशीब फळफळतं म्हणून हा वाक्प्रचार रूढ झाला. आमच्या लहानपणी मुंबईत काकवी मिळायची. पोळीबरोबर काहीतरी गोड हवं तर काकवी नाहीतर गूळ ताटात वाढला जायचा. चहाही गुळाचाच. माझा जन्म १९६१ सालचा. त्या वेळी देशातलं दरडोई गुळाचं सेवन वर्षाला १५ किलो होतं तर साखरेचं पाच किलो. २०१०-११ सालात भारतीय माणूस वर्षाला २० किलो साखर खाऊ लागला तर गुळाचं सेवन पाच किलोपर्यंत खाली आलं. कारण साखर स्वस्त झाली आणि गूळ महागला. साखरेमध्ये शून्य पोषणमूल्यं आहेत तरीही जगभरात साखरेच्या सेवनाचं प्रमाण संपूर्ण जगात वाढत चाललं आहे. साखर, चहा, कॉफी, कोको अशा अनेकानेक पदार्थांचं जागतिकीकरण होण्याची प्रक्रिया गेल्या दोन-तीनशे वर्षांतली आहे. आठवडी बाजार अगदी आदिवासींच्या प्रदेशातही भरतात. पण ज्याला आपण बाजारपेठ म्हणतो तिच्या विस्ताराला सुरुवात झाली युरोपातून. नव्या पदार्थांचं व्यसन लोकांना लावण्यावरच अन्न प्रक्रिया उद्योगांची मदार असते. मुद्दा अन्न प्रक्रिया उद्योगांवर टीका करण्याचा नाही तर माणसं वा समाजाच्या आहारात बदल केव्हा होतो, कसा होतो, नव्या चवी केव्हा आणि कशा स्वीकारल्या जातात हे समजून घेण्याचा आहे.

कापसाप्रमाणेच साखरेचाही शोध भारतातच लागला. कापसाप्रमाणे उसाचं मूळ स्थान भारत. रामायणातल्या मेजवानीच्या वर्णनात उसाचे करवे येतात म्हणजे भारतात उसाचं पीक प्राचीन काळापासून घेतलं जातं होतं, असं अनुमान काढता येईल. ऊस चोखून खावा म्हणजे उसाची गोडी शोषता येते. उसाच्या दाट रसाला फणिता म्हणतात. या फणितापासूनच गूळ आणि शर्करा तयार होते अशी माहिती अथर्ववेदात आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्राचा काल इसवीसन पूर्व ३००. या ग्रंथात उसाच्या रसापासून गूळ, फणिता, खांड, खांडसरी, मत्स्यांदिका (माशाच्या आकाराचे साखरेचे स्फटिक) आणि शर्करा अशा अनेक प्रकारची साखर तयार करतात अशी नोंद आहे. सुश्रुत आणि चरक संहितेत साखरेच्या औषधी गुणांची चर्चा आहे. चिनी लोकांचा दावा आहे की साखरेचा शोध त्यांनीच लावला. पण ऐतिहासिक पुरावे असं सांगतात की उसापासून साखर तयार करण्याचं तंत्र शिकून घेण्यासाठी चीनच्या सम्राटाने काही कारागिरांना गंगेच्या खोऱ्यात पाठवलं होतं. इसवीसन पूर्व ५५० ते ४८६ या काळात पर्शियामध्ये दरायसचं साम्राज्य होतं. त्याने सिंधू खोऱ्यावर आक्रमण केलं तेव्हा त्याला बांबूसारख्या दिसणाऱ्या आणि मधमाशांच्या मदतीशिवाय मध देणाऱ्या वनस्पतीचा अर्थात गवताचा शोध लागला. या पर्शियन लोकांनी उसासोबतच साखर बनवण्याचं तंत्रही मायदेशात नेलं आणि तिथे साखर उद्योग सुरू केला. साखरेचा व्यापारही त्यांनी सुरू केला. त्यामुळे अल्पावधीत उसाची लागवड सिंधू नदीपासून आफ्रिकेत आणि काळ्या समुद्रापर्यंत सुरू झाली. उसाच्या रसापासून बनवलेल्या दाट पाकाला मसाल्याचा पदार्थच म्हणत, कारण पदार्थ टिकवण्याचा गुणधर्म होता त्याच्यात. संस्कृत शर्करा या शब्दांचं ग्रीक आणि लॅटिन भाषेत स्थानांतरण होऊन सॅकॅरम हा शब्द साखरेला मिळाला. (या सॅकॅरमपासूनच रम हा शब्द निर्माण झाला. उसाच्या रसाच्या मळीपासून तयार होणारी दारू. असो.) मुद्दा हा की साखर

या पदार्थाचं मार्केट पोटेन्शिअल भारतीय लोकांच्या ध्यानी आलं नाही. पर्शियन आणि त्यानंतर अरब लोकांनी साखरेचा व्यापार सुरू केला. शेजारी राष्ट्रांना ते साखर निर्यात करू लागले. त्यामुळे साखर बनवण्याच्या तंत्रातही प्रगती केली. तो काळ असा की युरोप सुरू व्हायचा आणि संपायचाही ग्रीसमध्ये. (उरलेल्या युरोपात बहुधा हिममानव वा निआंडरथल यांचाच वावर असावा.) ग्रीसचा संबंध पर्शिया आणि आशियाशी होता. सिकंदरने ग्रीसच्या साम्राज्याच्या सीमा सिंधू खोऱ्यापर्यंत विस्तारल्या होत्या. मॅगेस्थेनिसने तर नोंदच करून ठेवलीय की भारतीय लोक गवतापासून मध बनवतात. पण ग्रीकांनाही युद्धशास्त्र, तत्त्वज्ञान, चर्चा, वाद-विवाद ह्यांतच रस असावा. त्यामुळे साखर उद्योगात त्यांनी रुची घेतली नाही की त्याचा विकासही केला नाही. (ह्याबाबतीत ग्रीक आणि भारतीयांमध्ये भलतंच साम्य दिसतं.) अरब व्यापारी होते. हुषार आणि धूर्त होते. युरोपियनांची साखरेची आवड हेरून साखरेचे कारखानेच त्यांनी काढले. उसाचं उत्पादन करता येईल असे प्रदेश त्यांनी आपल्या आधिपत्याखाली आणले. साखरेला उष्णता दिली की ती वितळते, खमंग होते, तिचा रंग तपकिरी बनतो. ती चिकट होते. अरबी भाषेत या साखरेला म्हणत कुरत अल मिल. त्यापासूनच कॅरॅमल हा शब्द बनला. कॅरॅमल म्हणजे मधुर मिठाचा गोळा. इसवीसनाच्या दहाव्या दशकापर्यंत साखरेला पांढरं मीठ म्हणत. कारणं दोन. पहिलं हे की पदार्थ टिकवण्याचा गुण साखरेत होता आणि दुसरं, मीठ काळपट वा मातकट रंगाचं होतं. स्वच्छ पांढरं मीठ तयार करण्यासाठी आवश्यक असणारं तंत्रज्ञान त्या काळात नव्हतं. तर या कॅरॅमलचा उपयोग अरबी स्त्रिया अंगावरील लव काढण्यासाठी करत. सौंदर्यप्रसाधनांमध्ये साखरेचा वापर अरबांनी सर्वप्रथम सुरू केला. म्हणजे सर्वप्रथम काकवी, गूळ अशा क्रमाने पर्शियन साखरेकडे वळले. साखरेचा शोध लागण्याआधी गोड पदार्थ म्हणजे मधच पर्शियन आणि युरोपियनांना ठाऊक होता. मधाचं ठोक उत्पादन करता येतं नव्हतं त्यामुळे साखरेच्या गोडीची भुरळ अरब आणि युरोपियनांना पडली.

अरब मुसलमान धर्मभोळे, एका हातात कुराण आणि एका हातात तलवार घेऊन जग पादाक्रांत करायला निघाले, अशी चुकीची प्रतिमा आपल्याकडच्या इतिहासाच्या पुस्तकांनी तयार केलीय. अगदी नरहर कुरुंदकरही त्यातून सुटलेले नाहीत. वस्तुतः अरब व्यापारी होते. उद्यमशील होते. विचाराने प्रगत होते. वेगवेगळे प्रयोग करणारे होते. ॲरिस्टॉटल आणि अन्य ग्रीक तत्त्वज्ञांच्या ग्रंथांचे अभ्यासक होते. (अरबी प्रवाशांच्या नोंदी त्या काळातल्या युरोपियन प्रवाशांपेक्षा अधिक विवेकशील आहेत. उदाहरणार्थ 'अल बेरूनीचा भारत' हा ग्रंथ.) त्यामुळेच त्यांचं युद्धतंत्र प्रगत होतं. म्हणूनच ते जग पादाक्रांत करू शकले. अरबांनी साखरेच्या व्यापारातून बख्खळ संपत्ती मिळवली. तेराव्या शतकातील फ्रान्समधील नोंदी पाहा. सॅव्होईच्या काऊंटेसने लिहिलेल्या



**उसाच्या लागवडीसाठी अमेरिकेतील मूळ निवासींना गुलाम, वेठबिगार म्हणून कामाला जुंपण्यात आलं. त्यांचा अनन्वित छळ करण्यात आला. हे सर्व पोपच्या धर्माज्ञेनुसार चाललं होतं. एदुआर्दो गॅलेनोने त्याच्या ग्रंथात पुढीलप्रमाणे नोंद केलीय.... जिवंत जाळण्याची शिक्षा दिलेल्या एका गुलामाला अमेरिकेच्या मूळ रहिवाश्याला, युरोपियन धर्मगुरुने विचारलं, की मेल्यानंतर तुला स्वर्गात जायचंय की नरकात. त्याला तर स्वर्ग आणि नरक ह्या संकल्पनाच ठाऊक नव्हत्या. त्याने विचारलं, गोरा माणूस कुठे जातो? पाद्री म्हणाला, स्वर्गात. मग मी नरकात जाईन, गुलाम उत्तरला आणि त्याच्या पायाखालची लाकडं कुरकुरत जळायला सुरुवात झाली.**

घरखर्चात एक पौंड साखरेला दोन सोन्याच्या साऊस आणि पाच चांदीचे दिनार एवढी किंमत मोजावी लागे असा उल्लेख आहे. बर्गंडीच्या काऊंटेसने १२९९ साली साखरेच्या पंधरा गोणी खरेदी केल्या आणि त्यासाठी पंधरा गोणी चांदी एवढी किंमत तिला मोजावी लागली.

ऊस हे नगदी पीक होतं. त्याच्या लागवडीसाठी आणि साखर कारखान्यांसाठी गुलामांना कामाला जुंपलं जाई. गुलामीची मुसलमानांची वा अरबांची आणि युरोपियनांची संकल्पना यात मूलभूत फरक आहे. युरोपियनांसाठी जमीन हेच संपत्तीच्या निर्मितीचं केंद्र होतं तर अरबांसाठी व्यापार. युरोपात जमीन मालकीला महत्त्व होतं आणि मुसलमानांमध्ये गुलामांच्या संख्येवर मालकाची श्रीमंती मोजली जायची. गुलामाने मालकाच्या संपत्तीत भर घालणं अपेक्षित होतं. जमीन अर्थात शेती हे उत्पादनाचं साधन नसल्याने गुलामाने मालकाला व्यापारात मदत करणं अपेक्षित होतं. (सिंदबादच्या सफरीतले किंवा अरेबियन नाईटसमधले गुलामांचे संदर्भ काळजीपूर्वक वाचले तर हा मुद्दा स्पष्ट होईल.) त्यामुळे अरबी मुसलमान गुलामांना सैन्यातही भरती करायचे. ही भरती प्रामुख्याने आफ्रिकेतूनच व्हायची. पण या गुलामांवर ते वेगवेगळ्या जबाबदाऱ्या सोपवायचे. अगदी लष्करी मोहिमांच्याही. त्यामुळेच मलिक अंबर असो की शिद्दी जौहर, ह्या गुलामांना राज्य स्थापन करण्याची संधी मिळाली. सिंधू नदीच्या खोऱ्यातही आफ्रिकन गुलामांनी आपल्या पराक्रमाने लष्करात आणि दरबारात मानाच्या जागा मिळवल्या होत्या.

संपत्तीची निर्मिती जमिनीतून– अर्थात शेतीतून– होते अशीच युरोपियनांची धारणा होती. त्यामुळे गुलामाला जमिनीवर राबवून त्याच्याकडून अधिकाधिक काम करून घेणं असा त्यांचा खाक्या होता. शेतीकामासाठी लागणारा एक पशू अशीच त्यांची गुलामांबद्दलची धारणा होती. आफ्रिकेतील काळ्या वर्णाच्या वा अमेरिकेतील तांबड्या वर्णाच्या लोकांना ते माणूसच मानत नव्हते. त्यांना जनावरांसारखीच वागणूक दिली जायची. पायात बेड्या घातलेल्या गुलामांना गळ्यातल्या साखळीने एकमेकांना जोडून त्यांच्या टोळ्या जहाजावर चढवल्या जायच्या. जेवढे जास्त गुलाम कोंबाल तेवढा नफा जास्त या हिशेबाने कमी जागेत जास्तीत जास्त गुलामांना डांबलं जायचं. मल–मूत्र विसर्जनाचीही सोय नसायची. उलट्या, हगवण, अन्य रोग यामुळे ३० टक्के गुलाम अमेरिकेच्या किनाऱ्याला पोचेपर्यंत मरून जायचे. त्यांची प्रेतं समुद्रात फेकून दिली जात. इस्लाममध्ये विशेषतः अरबस्तानातील इस्लाममध्ये गुलामांना मनुष्यप्राण्याची वागणूक दिली जायची. युरोपियन लोक तेवढे सुसंस्कृत नव्हते.

युरोपियन समाज सुसंस्कृत व्हायला सुरुवात झाली दहाव्या शतकात. व्यापार वाढू लागला आणि पूर्वेकडून येणाऱ्या मसाल्याच्या पदार्थांची मागणी वाढली. साखर, मसाले, रेशमी आणि सुती वस्त्रं, हस्तिदंत, चंदनाच्या कलाकुसरीच्या वस्तू अरबांकडून खरेदी करून युरोपातील देशांना चढ्या दराने विकणे हा व्हेनिसच्या व्यापाऱ्यांचा धंदा बनला. व्हेनिसमध्येच साखरेची पहिली वखार सुरू झाली. (आणि यथावकाश साखर निर्मितीलाही सुरुवात झाली.) या व्यापारामुळे युरोपियन देशातील सरकारांना मोठं उत्पन्नाचं साधन गवसलं. या मालावर अव्वाच्या सव्वा जकात आकारली जायची. त्यातच जकात अधिकाऱ्यांना लाचही द्यावी लागायची. त्यामुळे आधीच महाग असलेल्या या मालाच्या किंमती आणखी वाढत असत. पण हा माल बंदरात पोचल्यावर चुटकीसरशी विकला जात असे. त्यामुळेच सोळाव्या शतकात युरोपातील संपन्न शहर होतं व्हेनिस. मर्चंट ऑफ व्हेनिस हे शेक्सपियरचं नाटक याच काळातलं आहे. भूमध्य सागरी प्रदेशात व्हेनिस व्यापाराच्या केंद्रस्थानी आल्याने रेनेसाँ वा प्रबोधनाचा आविष्कार सर्वप्रथम इटलीमध्ये झाला. मे.पुं.रेगे यांनी म्हटलं आहे, ख्रिश्चन धर्मातील मानवी प्रकृतीची पापमयता रेनेसाँने नाकारली, पाप ही संकल्पनाच नाकारली. माणसाच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक शक्तींच्या उत्कर्षात, त्यांच्या मुक्त विलासात माणसाचे अंतिम कल्याण आहे असे मानले. माणसाच्या मनोधर्मांवरील आणि त्याला लोभनीय वाटणाऱ्या बाह्य सृष्टीवरील पापाचे सावट दूर झाले. रूप–रस–गंध–स्पर्शांनी गजबजलेल्या निसर्गातील आनंद अनुभवायला माणूस मोकळा झाला. लिओनार्दो दा विंची, मायकेल अँजेलो हे या कालखंडाचे प्रतीक मानले जातात. रेनेसाँच्या या कालखंडात मूठभर व्यक्तीच मुक्त झाल्या. त्यांचं कर्तृत्व असामान्य होतं. पण तो कालखंड इतिहासाच्या ओघाला वळण देऊ शकला, गती देऊ शकला, कारण विज्ञानाची परंपरा (उदा. गॅलिलिओ, केप्लर इत्यादी) उभी राहिली आणि सामान्य माणसंही खलाशी, शेतकरी–सैनिक, शेतकरी–कारागीर, व्यापारी इत्यादी या चळवळीत ओढली गेली. त्यामुळे युरोपमध्ये रेनेसाँनंतर धर्मसुधारणेची म्हणजेच रिफर्मेशनची चळवळ समाजाच्या तळागाळात पोचली. त्यातूनच औद्योगिक क्रांतीची पायाभरणी झाली असं मॅक्स वेबर या समाजशास्त्रज्ञाने प्रोटेस्टंट एथिक्स अँण्ड स्पिरीट ऑफ वेस्टर्न कॅपिटॅलिझम या ग्रंथात सविस्तर विशद केलं आहे. रिफर्मेशनच्या नंतर सुरू झालेल्या एनलायन्मेंट या सांस्कृतिक आंदोलनाने क्रांतीच्या मशाली पेटवल्या.

विज्ञानाच्या क्षेत्रात राबणाऱ्या अनेक कष्टकऱ्यांच्या श्रमामुळे काळजीपूर्वक केलेल्या निरीक्षणाने पाखडून घेतलेल्या वस्तुस्थिती सामान्य नियमांनी एकत्र विणल्या जात होत्या. निसर्गाविषयीच्या ज्ञानाला वस्तुस्थितीचा भक्कम आधार लाभत होता आणि विज्ञानाचा आकार प्राप्त होत होता. सैनिक आणि खलाशी, इंजिनीयर आणि कारागीर ह्यांच्या अनुभवातून जी माहिती मिळत होती ती आता विज्ञान आत्मसात करू शकत होते. त्यांच्या समस्यांना आता कामचलाऊ, तात्पुरती उत्तरे मिळत नव्हती; ही उत्तरे विज्ञानाच्या हळूहळू रचल्या जाणाऱ्या इमारतींचे भाग बनत

होती. अशा शब्दांत मे.पुं.रेगे यांनी रेनेसाँच्या कालखंडाची उपलब्धी मांडली आहे.

या प्रक्रियेची कारणं सामाजिक आणि राजकीय होती. मुसलमानांच्या आधिपत्याखालील जेरुसलेमसारखी पवित्र स्थळं परत मिळवण्यासाठी युरोपातील ख्रिश्चन देशांनी मोहिमा (क्रूसेडस्) सुरू केल्या ११-१२-१३ व्या शतकात. रेनेसाँची मुळं या काळात आहेत. कारण या क्रूसेडसमुळे युरोपमध्ये सामाजिक स्थित्यंतरं घडून आली. हजारो युरोपियन ख्रिश्चन या मोहिमांमध्ये सामील झाले. सैन्य भरतीसाठी युरोपातील भूदासांना म्हणजेच शेतकऱ्यांना जमिनीपासून मोकळं करणं सरंजामदारांना भाग पडलं. आपण शेतीपासून अर्थात गुलामीतून मोकळे होऊ शकतो ह्या अनुभवानेच शेतकऱ्यांमध्ये नवं चैतन्य संचारलं. हजारो युरोपियन या मोहिमांमधून सीरिया, पॅलेस्टीन, तुर्कस्तान, इजिप्त इत्यादी देशांमध्ये गेले. हजारो ठार झाले, पण कित्येक माघारी गेले. अरबस्तानात गेलेले युरोपियन अरबांच्या ऐश्वर्याने, प्रगतीने दिपून गेले. अरबांकडे गेलेला ग्रीक संस्कृतीचा वारसा, वैज्ञानिक ज्ञान, तंत्रज्ञान आणि नानाविध नव्या आणि चैनीच्या वस्तूंची ओळख त्यांना झाली. साखरेची चव सामान्य युरोपियनांनी म्हणजे सैनिकांनी सर्वप्रथम अरब राष्ट्रांमध्ये चाखली. या मोहिमांमधून परत आलेल्यांनी अनेक नवीन वस्तू आणि चैनीच्या चीजा आणल्या. त्यांची चटक सरंजामदारांना लागली. म्हणून पगाराच्या आणि काही हिश्शाच्या मोबदल्यात शहरातल्या आणि आजूबाजूच्या कारखान्यांत काम करण्याची सवलत सरंजामदारांनी शेतकऱ्यांना दिली. त्यामुळे कारागिरांचा वर्ग निर्माण झाला. व्यापारी वर्गही तयार होऊ लागला. व्यापाराची आणि उद्योगधंद्याची केंद्रे म्हणून शहरं उदयाला आली. उद्योगांना, व्यापाराला नवीन रस्ते, दळणवळणाची साधनं यांची गरज भासू लागली. पतपेढ्यांचे, बँकांचे व्यवहार वाढू लागले. १४५३ मध्ये तुर्कांनी कॉन्स्टॅटिनोपल ताब्यात घेतलं. त्याचं नामांतर इस्तंबूल करण्यात आलं. तिथे स्थायिक असलेले विद्वान आणि कलावंत पळाले आणि त्यांनी इटलीत आश्रय घेतला. हे पंडित आणि कलावंत यांना व्हेनिसच्या व्यापाऱ्यांनी आश्रय दिला. त्यातून विचारमंथनाला सुरुवात झाली तेच रेनेसाँ.

कारखानदारी आणि व्यापारामुळे विज्ञान-तंत्रज्ञानाला प्रोत्साहन मिळालं. शहरीकरण वाढलं. शेती उत्पादनात घट झाल्याने आहारात बदल करणं भाग पडलं. वनस्पतिजन्य प्रथिनांपेक्षा प्राणिजन्य प्रथिनांकडे शहरी लोक वळू लागले. मासेमारी आणि पशुपालनाला प्रोत्साहन मिळालं. मांस आणि मासे टिकवण्यासाठी मीठ-मसाल्यांची गरज भासू लागली. भूमध्य समुद्रात युरोपीय उद्योजक आणि व्यापाऱ्यांची दाटी झाली. त्यामुळे नव्या भूमीचा शोध गरजेचा बनला. त्यातच पूर्वेकडून येणाऱ्या मसाल्याच्या पदार्थांच्या आणि अन्य वस्तूंच्या व्यापारावर अरबांचं नियंत्रण प्रस्थापित झाल्याने नवे सागरी मार्ग ही युरोपची गरज बनली.



**एक किलो मिठाईची किंमत ३०० रुपयांच्या आसपास असते. त्यातलं साखरेचं प्रमाण ४०० ग्रॅम असतं. २८ ते ३० रुपये किलोची साखर, मूल्यवर्धित उत्पादनात किती पटीने विकली जाते याचा अंदाज मिठाईच्या किंमतीवरून येऊ शकतो. तीच गत कोणत्याही शीतपेयाची वा चॉकलेट, गोळ्या इत्यादी उत्पादनांची आहे. साखरेच्या किंमती कमी असण्याचा फायदा या उद्योगांना होतो. शेतकऱ्यांना उसाचा दर देताना मात्र कारखान्याच्या उत्पादन खर्चाचा घोळ सरकारी यंत्रणा घालते. त्याचबरोबर साखर कारखान्यांना वेगवेगळ्या प्रकारची आर्थिक मदत देण्याच्या उपाययोजनाही सरकारयंत्रणेच्या सुपीक डोक्यातून निघतात. साखर उद्योग सरकारी नियंत्रणातून मुक्त होणं केवळ शेतकऱ्यांच्या हितासाठीच नाही तर समाजाच्या आरोग्यासाठीही आवश्यक आहे.**

यामध्ये पोर्तुगीजांनी आघाडी घेतली. त्यांच्यापाठोपाठ स्पॅनिश स्पर्धेत उतरले. पोर्तुगाल आणि स्पेनमध्ये साखरेचं उत्पादन तोपावेतो सुरूही झालं होतं. ख्रिस्तोफर कोलंबस भारताच्या शोधासाठी निघाला आणि पोचला कॅरेबियन बेटांवर. स्पेनच्या राजाला पाठवलेल्या पत्रात तो म्हणतो, 'महाराज, आपल्याला लागेल तेवढं सोनं मी आपल्याकरता आणीन. मसाल्याचे पदार्थ, कापूस, गम, रेझिन्स असे अनेक पदार्थ मी मायदेशी घेऊन येईन.' वास्को द गामाने पूर्वेकडे जायचा नवा सागरीमार्ग शोधून काढल्याने मसाल्याच्या पदार्थांची गरज भागू लागली होती. त्यामुळे नव्या जगात होणाऱ्या अन्य अन्न पदार्थांवर युरोपची दृष्टी वळली.

शेती जोवर संस्कृतीच्या केंद्रस्थानी होती तोवर समाज खाऊन–पिऊन सुखी असतो किंवा 'ठेविले अनंते तैसेची राहावे, चित्ती असो द्यावे समाधान', या वृत्तीचा असतो. व्यापार केंद्रस्थानी येऊ लागल्यावर राहणीमानात, आचारविचारात, आहारात, भाषेत बदल होऊ लागतो. नव्याचा स्वीकार करण्याची मानसिकता तयार होते. दुसऱ्या प्रदेशावर राज्य करायचं तर आपल्या संपत्तीत वाढ करण्यासाठी हे सूत्रं भक्कम ठेवून युरोपीय देश नव्या प्रदेशांकडे पाहू लागले. नव्या भूमीवर साखर, कॉफी, कोको या नवीन पदार्थांची लागवड करण्यासाठी युरोपीय राष्ट्रांमध्ये होड लागली. ते पदार्थ लोकांच्या आहारात यायला हवेत म्हणून त्यांचा प्रचार करायचा. लोकांना नवीन सवयी लावायच्या. थोडक्यात आचरणात बदल घडवून आणणं हा केवळ विचारपरिवर्तनाचा कार्यक्रम राहिला नाही तर अर्थशास्त्राशी वा अधिक नेमकेपणे बोलायचं तर नफ्याशी जोडला गेला. चहा हे पेय केवळ भारतातच नाही तर युरोपातही ब्रिटिशांनी असंच लोकप्रिय केलं.

उसाच्या लागवडीसाठी अमेरिकेतील मूळ निवासींना गुलाम, वेठबिगार म्हणून कामाला जुंपण्यात आलं. त्यांचा अनन्वित छळ करण्यात आला. हे सर्व पोपच्या धर्माज्ञेनुसार चाललं होतं. एदुआर्दो गॅलेनोने त्याच्या ग्रंथात पुढीलप्रमाणे नोंद केलीय.... जिवंत जाळण्याची शिक्षा दिलेल्या एका गुलामाला अमेरिकेच्या मूळ रहिवाश्याला, युरोपियन धर्मगुरुने विचारलं, की मेल्यानंतर तुला स्वर्गात जायचंय की नरकात. त्याला तर स्वर्ग आणि नरक ह्या संकल्पनाच ठाऊक नव्हत्या. त्याने विचारलं, गोरा माणूस कुठे जातो? पाद्री म्हणाला, स्वर्गात. मग मी नरकात जाईन, गुलाम उत्तरला आणि त्याच्या पायाखालची लाकडं कुरकुरत जळायला सुरुवात झाली.

उसाच्या मळ्यांमध्ये आणि साखर कारखान्यांत कामाला जुंपलेले हजारो स्थानिक निवासी युरोपियनांच्या संपर्कात आल्याने अनेक रोगांना बळी पडले. शेकडो पळून गेले म्हणून एका कॅथॉलिक धर्मगुरूनेच स्पेनच्या राजाकडे मागणी केली की अमेरिकेतील स्थानिक निवासींऐवजी आफ्रिकेतल्या गुलामांना या कामाला जुंपावं. राजाच्या हुकुमानुसार १५०० गुलामांची पहिली तुकडी दक्षिण अमेरिकेतील उसाच्या मळ्यांवर आणि साखर कारखान्यात कामाला पाठवण्यात आली. त्यानंतर आफ्रिकेत पकडून आणलेल्या गुलामांचा ओघ अमेरिकेतल्या ऊसमळ्यांवर सुरू झाला. न्यू इंग्लंड या वसाहतीत ब्रिटिश लोकांनी काकवी वा उसाच्या मळीपासून रम नावाचं मद्य बनवायला सुरुवात केली. काळ्या गुलामांच्या श्रमातूनच ही रम बनवली जात असे आणि क्रूर विनोद असा की या रमच्या मोबदल्यात आफ्रिकेतून गुलामांची खरेदी केली जाऊ लागली. त्यामुळे व्यथित झालेल्या शेर्मान एडवर्डस या गीतकाराने काकवी, रम आणि गुलामी यामुळे खणखणाऱ्या पौंडाच्या तालावर आपण नृत्य करावं का? असा सवाल केला. मोलॅसिस टु रम हे त्याचं गीत खूप लोकप्रिय झालं. इसवीसन १७०० पर्यंत साखर आणि गुलामी हे युरोपमध्ये समानअर्थी शब्द बनले. त्यामुळे गुलामगिरी नष्ट करू पाहणारे साखरेवर बहिष्कार घालण्याच्या गोष्टी करू लागले. एका निग्रोची कैफियत या कवितेत विल्यम कॉपर या कवीने नेमका हाच प्रश्न विचारला..

*आम्ही ज्यासाठी राबतो ती वनस्पती निसर्गाने निर्माणच का केली ?*
*श्वासांनी त्याला वारा घालावा लागतोय, अश्रूंनी सिंचावं लागतंय*
*आमच्या घामांनी मातीला वस्त्र चढवावं लागतंय*
*हे दगडी हृदयाच्या मालका*
*आनंदाने लोळतो आहेस*
*विचार कर किती लोकांनी आपल्या पाठी मोडायच्या*
*तुझ्या उसातल्या साखरेसाठी*

इंग्लंडातील या असंतोषाची दखल घेऊन ईस्ट इंडिया कंपनीने आपल्या साखरेच्या जाहिरातीत बदल केला. ईस्ट इंडिया साखर : गुलामांनी बनवलेली नाही. कंपनीने गुलामांना कामाला जुंपलेलं नव्हतं हे खरं, पण मळ्यावर आणि कारखान्यात काम करणाऱ्या मजुरांना तुटपुंज्या मजुरीवर राबवून घेतलं जात होतं. अठराव्या शतकात आफ्रिका खंडातली लोकसंख्या घटल्याने गुलामांच्या किंमती वाढल्या, दक्षिण अमेरिकेतील ऊसमळ्यांमुळे साखरेच्या उत्पादनात प्रचंड वाढ झाल्याने किंमती कोसळल्या. फ्रेंचांनी साखरेच्या उत्पादन खर्चात बचत केल्याने ब्रिटिश साखर कारखानदार बाजारपेठेबाहेर फेकले गेले.

१७५७ मध्ये प्लासीच्या विजयानंतर ईस्ट इंडिया कंपनीचा अंमल भारतात स्थिरावला. खुल्क खुदाका, मुल्क बादशाहका अंमल कंपनी सरकारका, अशी स्थिती निर्माण झाली. उत्तर भारत, बिहार आणि बंगाल या प्रदेशातील शेती उत्पादनांचा अभ्यास करण्याची जबाबदारी कंपनीने डॉ.फ्रान्सिस बुकानिन या संख्याशास्त्रज्ञावर सोपवली. १८०८ ते १८१५ या सात वर्षांच्या कालावधीत बुकानिनने अत्यंत काळजीपूर्वक माहिती गोळा करून आणि तपासून आपला सविस्तर अहवाल कंपनीला सादर केला. 'द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया' या ग्रंथात रोमेशचंद्र दत्ता यांनी या अहवालाच्या आधारे असं नोंदवलंय की उत्तर भारत, बिहार आणि बंगाल या प्रांतात उसाची मोठ्या प्रमाणावर लागवड होत होती.

गूळ, खांडसरी आणि साखरेचं उत्पादनही घेतलं जात होतं. पण उच्च दर्जाच्या साखरेचा उत्पादनखर्च अधिक होता. वेस्ट इंडिज बेटावरील उसाच्या जाती आणि इथल्या उसाच्या जातींत फरक नव्हता पण उत्पादनप्रक्रियेत व्यावसायिकता नव्हती. याचा अर्थ गंगा-यमुनेच्या खोऱ्यात साखरेचा शोध इसवीसनापूर्वी लागलेला असला तरीही व्यापार, कार्यसंस्कृती आणि मागणीप्रधान उत्पादनाचा अभाव असल्याने ऊस वा साखर उत्पादनाच्या तंत्रात अजिबात प्रगती झाली नव्हती. अरब आणि त्यानंतर युरोपियन लोकांनी साखर उत्पादनाच्या तंत्रात आणि उपपदार्थांच्या उत्पादनात कमालीची प्रगती केली होती. फक्त सामाजिक चालीरीतींबाबतच नाही तर उत्पादन आणि बाजारपेठ यांमध्येही आपण परंपरानिष्ठ होतो आणि आहोतही. भोपाळमध्ये पारंपारिक भारतीय तंत्रज्ञानाचं कायमस्वरूपी प्रदर्शन मांडण्यात आलंय. आदिवासी जमातींनी शोधून काढलेले उसाचे चरक, तेलघाण्या इत्यादी यंत्रं तिथल्या कायमस्वरूपी प्रदर्शनात ठेवली आहेत. आजही पुण्याच्या किंवा साताऱ्याच्या रस्त्यावर त्याच तंत्रानुसार उसाचा रस काढला जातो. जातिव्यवस्था ही उत्पादन व्यवस्थाही होती. गंमतीची बाब म्हणजे ह्या उत्पादन व्यवस्थेचा बाजारपेठेशी फारसा संबंध नव्हता. केवळ जगण्यापुरतं उत्पादन करण्याशी होता. बलुतेदारांना मिळणारं बलुतं आणि त्यांच्या कष्ट आणि कौशल्याचं बाजारमूल्यं ह्यांचा परस्पर संबंधच नव्हता. त्यामुळे कुशल कारागिराला तंत्रात वा यंत्रात संशोधन करावं, त्याची उत्पादन क्षमता वाढवावी यासाठी इन्सेटिव्हला वावच ठेवण्यात आला नव्हता. त्यामुळे बाजारपेठेसाठी ठोक उत्पादन करावं अशी प्रेरणाच भारतीयांना झाली नाही. अर्थातच साखरेचा शोध लावूनही साखर तंत्रज्ञानात, साखर उद्योगात आपण मागासलेले ठरलो.

अठराव्या शतकापर्यंत साखरेवर आधारित अन्नप्रक्रिया उद्योग निर्माण व्हायला सुरुवात झाली पण साखरेचं सेवन प्रामुख्याने घरगुती होतं. साखर उत्पादनाच्या तंत्रात बदल झाल्यावर, साखरेच्या ठोक पुरवठ्याची हमी मिळू लागल्यावर अन्न प्रक्रिया उद्योग विस्तारू लागले. महात्मा फुलेंनी आपल्या 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथात त्यांची नोंद घेतलेली आहे. विलायतेहून रुचीरुचीचे हलवे, मुरंबे, लोणची...इत्यादी सामान येऊ लागल्याने भारतातील कारागीर आणि कसबी जाती दारिद्र्यात लोटल्या गेल्या असं निरिक्षण म.फुलेंनी नोंदवलं आहे. एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकात घरगुती साखरेपेक्षा अन्नप्रक्रिया उद्योगांची साखरेची गरज वाढली. त्यांनीच साखरेचं व्यसन समाजाला लावलं असं म्हणता येईल. कारण साखरेचा घरगुती वापर फारसा नसतो. दिवसाला आपण किती चहा पितो वा किती वेळा घरात पक्वान्नं केली जातात? साखरेचं सेवन शीतपेयं, बिस्किटं, केक, अन्य मिठाई यांतून अधिक होतं. अन्नप्रक्रिया उद्योगांची जागतिक साम्राज्यं निर्माण व्हायला सुरुवात झाल्यानंतर साखर उद्योगावरील सरकारी नियंत्रणात वाढ होऊ लागली. सरकारचा हस्तक्षेप कळीचा ठरू लागला. जगातल्या फारच कमी देशांमध्ये साखर उद्योग नियंत्रणमुक्त आहे.

उसाची किंमत ठरवण्यात सरकारची भूमिका महत्त्वाची नाही तर कळीची असते. प्रत्येक कारखान्याला सरकारला लेव्ही साखर द्यावी लागते. म्हणजे एकूण उत्पादनाच्या दहा टक्के, सरकारी दराने. ही साखर सार्वजनिक शिधा वाटप यंत्रणेमार्फत वितरित केली जाते. खुल्या बाजारपेठेत कारखान्याने किती साखर केव्हा विकायची हा निर्णयही सरकार घेतं. किती साखर निर्यात करायची हेही सरकार ठरवतं. साखरेच्या किंमती स्थिर राहाव्यात, वाढू नयेत यासाठी सरकार ही खबरदारी घेतं. मुद्दा असा की साखरेच्या किंमती बाजारपेठेच्या शक्तींनी का नियंत्रित करायच्या नाहीत? साखर हा काही जीवनावश्यक पदार्थ नाही वा ते अन्नही नाही. गहू, तांदूळ, डाळी यांच्या व्यापारावरील वा किंमतीवरील सरकारचं नियंत्रण समजण्याजोगं आहे. साखर महाग झाली तर गरीब वा मध्यमवर्गीयांची उपासमार सुरू होणार नाही. जागतिक आरोग्य संघटना आणि राष्ट्रीय पोषण संस्था यांची साक्ष काढली तर धट्ट्याकट्ट्या माणसाच्या रोजच्या आहारात साखरेचं प्रमाण फक्त १० ग्रॅम असावं. साखर म्हणजे शून्य पोषणमूल्यं असलेल्या कॅलरीज वा उष्मांक. मात्र तरीही साखरेचा समावेश जीवनावश्यक वस्तूंच्या कायद्यात करण्यात आलाय. एकूण साखर उत्पादनाच्या केवळ ३० ते ३५ टक्के साखर घरगुती वापरासाठी खरेदी केली जाते. उरलेली सर्व साखर शीतपेयं, बिस्किटं, चॉकोलेटं, गोळ्या, मिठाई इत्यादी प्रक्रिया उद्योगांमध्ये वापरली जाते. या मार्गाने जी साखर आपण खातो त्यासाठी आपण किती पैसे अधिक मोजतो? एक किलो मिठाईची किंमत ३०० रुपयांच्या आसपास असते. त्यातलं साखरेचं प्रमाण ४०० ग्रॅम असतं. २८ ते ३० रुपये किलोची साखर, मूल्यवर्धित उत्पादनात किती पटीने विकली जाते याचा अंदाज मिठाईच्या किंमतीवरून येऊ शकतो. तीच गत कोणत्याही शीतपेयाची वा चॉकलेट, गोळ्या इत्यादी उत्पादनांची आहे. साखरेच्या किंमती कमी असण्याचा फायदा या उद्योगांना होतो. शेतकऱ्यांना उसाचा दर देताना मात्र कारखान्याच्या उत्पादन खर्चाचा घोळ सरकारी यंत्रणा घालते. त्याचबरोबर साखर कारखान्यांना वेगवेगळ्या प्रकारची आर्थिक मदत देण्याच्या उपाययोजनाही सरकारयंत्रणेच्या सुपीक डोक्यातून निघतात. साखर उद्योग सरकारी नियंत्रणातून मुक्त होणं केवळ शेतकऱ्यांच्या हितासाठीच नाही तर समाजाच्या आरोग्यासाठीही आवश्यक आहे.

**सुनील तांबे**

sunilambe07@gmail.com / Mob.: 9987063670

*(लेखक, 'रॉयटर्स मार्केट लाइट' (RML) चे संपादक आहेत. भारतातील शेतकऱ्यांसाठी २००७ साली सुरू झालेली पहिली व्यावसायिक माहिती सेवा, १३ राज्यांतील शेतकरी या सेवेचा लाभ घेत आहेत. )*

सुरेश द्वादशीवार

# टिकाल, पण उमटणार नाही



पवारांनी दाखविलेली दिशा लक्षात घेऊन प. महाराष्ट्रातील सर्वपक्षीय आमदारांच्या शिष्टमंडळाने आधीच दबलेल्या मुख्यमंत्र्यांवर दबाव आणण्यासाठी त्यांची भेट घेतली. त्याची प्रतिक्रिया म्हणून विदर्भ-मराठवाड्यातील आमदारांनी (बहुधा प्रथमच) एकत्र येऊन मुख्यमंत्र्यांवर आपलाही तसा दबाव आणण्यासाठी त्यांच्याकडे एक शिष्टमंडळ नेले. बिचारे मुख्यमंत्री... ते काय करणार? त्यांना पवारादिकांना नाराज करता येत नाही आणि आपलाही पक्ष सावरता येत नाही. शिवाय एखाद्या प्रश्नावर खंबीर भूमिका घेणे हा त्यांच्या कार्यशैलीचा व स्वभावाचाही भाग नाही... परिणामी शरद पवार सुजलाम् सुफलाम् प्रदेशांच्या वतीने आणि राज्यपाल कोरड्या विभागांच्या वतीने ही लढाई लढताहेत आणि ज्यांनी निर्णय घ्यायचा ते मुख्यमंत्री बघ्याची भूमिका बजावत आहेत.

पृथ्वीराज चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतली तेव्हा केंद्रातले एक जुने, जाणते व अधिकारपदस्थ नेते माझ्याशी बोलताना म्हणाले, 'त्यांच्याएवढा महाराष्ट्राविषयी अनभिज्ञ असणारा राजकारणी या राज्याचा मुख्यमंत्री होणे हे डिझास्टर आहे' तंत्रविज्ञान आणि एकूणच संगणकविषयक अध्ययन यात मोठी क्षमता बाळगणे हे एखाद्या राज्याचे नेतृत्व करायला पुरेसे असणारे शिक्षण नव्हे. मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्यापूर्वी चव्हाण हे राज्यमंत्री या नात्याने पंतप्रधानांच्या कार्यालयाचे प्रमुखपद सांभाळत. तेथे त्यांची भूमिका एखाद्या कार्यालयाच्या मुख्य सचिवाची वा व्यवसायातील मुनिमाची होती. ही भूमिका नेतृत्व शिकवीत नाही आणि नेता घडवीत नाही... त्यातही चव्हाणांनी ते पद सोडले आणि ते मुंबईच्या दिशेने निघाले तेव्हा त्यांच्या कार्यालयात नऊशेहून अधिक फाइल्स निर्णयावाचून पडून राहिल्या होत्या ही गोष्ट काँग्रेसच्याच एका ज्येष्ठ खासदाराने नंतर मला सांगितली.

राजकारणात तातडीने निर्णय घेणे ही नेहमीच फारशा शहाणपणाची बाब ठरत नाही. ज्या प्रश्नाविषयीच्या लोकभावना तीव्र असतात त्यावर घाईगर्दीने निर्णय घेताही येत नाहीत. जो प्रश्न सोडविता येत नाही तो चिघळत ठेवणे ही आंतरराष्ट्रीय राजकारणातही एक महत्त्वाची खेळी (वा ना-खेळी) मानली जाते. जगाच्या राजकारणातले अनेक प्रश्न गेली कित्येक वर्षे चिघळत ठेवले गेले वा राहिले त्याचे कारणही हेच आहे. एखाद्या प्रश्नाविषयीच्या लोकभावना शमल्या की त्याचा निर्णय करणे सोयीचे होते व तो निर्णय कसाही झाला तरी लोक त्याची फारशी दखल घेत नाहीत... पण महाराष्ट्राचे राजकारण आंतरराष्ट्रीय नाही आणि विकासाच्या प्रश्नावर लोकभावना क्षुब्ध होण्याची शक्यताही फारशी नाही. तरीही अतिशय सामान्य व लोकहिताचे प्रश्न निर्णयावाचून बाजूला ठेवले जात असतील तर तो राजकारणाला आलेल्या अनिर्णायकी स्थितीचा व थांबलेपणाएवढाच नाकर्तेपणाचा भाग होतो.

राज्यात विरोधी पक्ष प्रबळ आहेत, सरकारला आघाडीचा धर्म सांभाळावा लागत आहे आणि प्रसिद्धीमाध्यमांची संशयखोर वृत्ती प्रत्येकच निर्णयाची प्रयोगशाळेत करावी तशी चिकित्सा करीत आहे. यामुळे हे निर्णय थांबत असतील तर मात्र तो नेतृत्वाच्या नाकर्तेपणाएवढाच भित्रेपणाचाही भाग होतो. देशात लोकशाही आहे आणि लोकशाहीत सरकारच्या प्रत्येक निर्णयाची चिकित्सा करणे हा जनतेचा अधिकार आहे. जनतेच्या या अधिकाराला भिऊन निर्णय होत नसतील तर निर्णयकर्त्यांच्या भीतीला एका सूक्ष्म अप्रामाणिकपणाची किनार जडली आहे असेही म्हणणे भाग आहे... काही दिवसांपूर्वी विधानसभेतील विरोधी पक्षाचे नेते एकनाथ खडसे, मुख्यमंत्र्यांच्या त्यांचे सरकार पारदर्शी असल्याच्या अभिप्रायाविषयी ऐकवताना म्हणाले, 'पारदर्शी असणार नाही तर काय, निर्णय घ्याल तरच पारदर्शीपणाचा मुद्दा येतो ना'. जेथे पाहायलाच काही नाही तेथे पारदर्शी असले काय आणि नसले काय, एकच.

सरकारच्या नाकर्तेपणाला त्याच्या पक्षातली माणसेही आता कंटाळली आहेत. महाराष्ट्रातील पाण्याचे नियोजन योग्यरीत्या होत नसल्याची व सिंचनाच्या क्षेत्रात फार मोठा क्षेत्रीय अनुशेष असल्याची दखल राज्यपालांना घ्यावी लागावी आणि त्यांना त्याविषयीचे निर्देश सरकारला द्यावे लागावे याहून सरकारच्या नाकर्तेपणाची मोठी पावती दुसरी नसावी. सिंचनाच्या

अनुशेषाच्या प्रश्नावर सरकारात मतभेद आहेत हे खरे आहे. राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाला व त्याच्या प. महाराष्ट्रातील पुढाऱ्यांना सिंचन ही त्यांच्याच भागाची गरज आहे असे वाटत आले आहे. त्यामुळे मराठवाडा आणि विदर्भातील सिंचनाच्या योजनांना अपुरा पैसा देणे, दिलेला पैसा आर्थिक वर्ष संपता संपता त्यांच्याकडे जाईल अशी व्यवस्था करणे आणि अखेर तो तुम्ही वेळेत खर्च करू शकणार नाही म्हणून प. महाराष्ट्राकडे वळता करणे हा खेळ या पुढाऱ्यांनी गेली ३० वर्षे संतुलित विकासाच्या नावाखाली केला. परिणामी प. महाराष्ट्र सुजलाम् सुफलाम् झाला आणि मराठवाडा व विदर्भ हे विभाग कोरडे राहिले... वर तुमचे नेतृत्व कमजोर असल्याचे त्या प्रदेशांना ऐकवण्याचा कोडगेपणाही त्या सुजलाम् पुढाऱ्यांनी केला... या प्रकरणात राज्यपालांनी लक्ष घालून विदर्भ व मराठवाड्याचा अनुशेष भरून काढण्याचे निर्देश सरकारला दिले तेव्हा प्रत्यक्ष शरद पवारच त्यांच्यावर उखडले. विदर्भ व मराठवाड्यातील रखडलेली कामे पूर्ण करण्यात वेळ आणि पैसा घालविण्यापेक्षा प. महाराष्ट्रातील पूर्ण होत आलेली कामे अगोदर पूर्ण करा अशी भूमिका त्यांनी घेतली. तिकडे आहे तसे राहू द्या, आधी आमचे बघा ही त्यांची थोर राष्ट्रीय दृष्टी आहे आणि ती 'प्रॅग्मॅटिक' असल्याचे प्रशस्तिपत्र त्यांच्या स्तुतिपाठकांनी त्यांना एव्हाना दिलेही आहे.

पवारांनी दाखविलेली दिशा लक्षात घेऊन प. महाराष्ट्रातील सर्वपक्षीय आमदारांच्या शिष्टमंडळाने आधीच दबलेल्या मुख्यमंत्र्यांवर दबाव आणण्यासाठी त्यांची भेट घेतली. त्याची प्रतिक्रिया म्हणून विदर्भ-मराठवाड्यातील आमदारांनी (बहुधा प्रथमच) एकत्र येऊन मुख्यमंत्र्यांवर आपलाही तसा दबाव आणण्यासाठी त्यांच्याकडे एक शिष्टमंडळ नेले. बिचारे मुख्यमंत्री... ते काय करणार? त्यांना पवारादिकांना नाराज करता येत नाही आणि आपलाही पक्ष सावरता येत नाही. शिवाय एखाद्या प्रश्नावर खंबीर भूमिका घेणे हा त्यांच्या कार्यशैलीचा व स्वभावाचाही भाग नाही... परिणामी शरद पवार सुजलाम् सुफलाम् प्रदेशांच्या वतीने आणि राज्यपाल कोरड्या विभागांच्या वतीने ही लढाई लढताहेत आणि ज्यांनी निर्णय घ्यायचा ते मुख्यमंत्री बघ्याची भूमिका बजावत आहेत.

राज्यात जिल्हा परिषदांच्या निवडणुका पार पडल्या. महानगर व नगरपालिकांच्याही निवडी झाल्या. त्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी जमेल तेथे काँग्रेसशी आघाडी करून व जुळेल तेथे शिवसेना-भाजपाशी युती करून अधिकाधिक सत्तापदे मिळविली. त्याही वेळी 'आमची फसवणूक झाली' असे मागाहून म्हणण्याखेरीज मुख्यमंत्र्यांना काही करणे जमले नाही. राजकारणातले हे अनदेखलेपण एखादेवेळी समजून घेता येईल. कारण तो त्यांच्या पक्षीय हिताचा भाग आहे. पण विरोध होतो आणि टीका होते म्हणून विकासकामांबाबत पुढाकार व निर्णय न घेणे ही गोष्ट मात्र न समजण्याजोगी आहे. कारण त्यांचा संबंध राज्याशी व जनतेच्या विकासाशी आहे.

गेल्या वर्षभरात गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी पंचविसाहून अधिक पोलिसांचा व पन्नासावर नागरिकांचा बळी घेतला. खूँखार नक्षलवाद्यांची न्यायालये सुटकाच करतील असा तपास राज्याचे गृहखाते करीत राहिले आणि राज्यातली व देशातली न्यायालये सारी घटना व मानवाधिकार (त्यातले काहीएक न मानणाऱ्या) नक्षली शस्त्राचाऱ्यांच्या बाजूने उभे करीत राहिली... महाराष्ट्राचे राज्यकर्ते आणि मुख्यमंत्री यांची याविषयीची भूमिका कोणती?.. गप्प राहून आपले मूक पारदर्शीपण सांभाळण्याची?

...या साऱ्यावर संतापून मिलिंद देवरा या काँग्रेसच्या तरुण खासदारानेच आता त्याच्या मनातली खदखद जाहीर केली आहे. मिलिंद देवरा हे केंद्र सरकारात तंत्रविज्ञान आणि दळणवळण विभागाचे राज्यमंत्री आहेत. शिवाय ते देवरा असल्याने त्यांच्या टीकेला एक प्रादेशिक वजनही आहे. महाराष्ट्राचा व मुंबई या देशाच्या आर्थिक राजधानीचा विकास मुख्यमंत्र्यांच्या निर्णय न घेण्याच्या वृत्तीने रखडला असल्याची टीका या तरुण मंत्र्याने केली आहे. ज्या विषयात राजकारण नाही, राजकीय तेढ नाही तेही विषय या वृत्तीमुळे निकालात निघत नसल्याची त्यांची तक्रार आहे. तारापोरवाला अॅक्वेरियमचा प्रलंबित प्रश्न देवरा यांच्या तात्कालिक उद्रेकाला कारण ठरला असला तरी नव्या मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळासारखे मुंबईशी संबंधित असणारे विषयही निर्णयावाचून असेच अडले असल्याचा त्यांचा रोष आहे... काँग्रेस हा तसाही शहरी प्रश्नांबाबत धीमे चालणारा अनास्थेवाईक पक्ष आहे. त्यातून मुंबईतील प्रत्येक प्रश्नाचा संबंध कोणत्या ना कोणत्या उद्योगपतीशी, कारखानदार आणि आर्थिक संस्थेशी जुळला आहे. त्यांचे लागेबांधे मुंबईपासून दिल्लीपर्यंत पोहोचणारे आहेत. शिवाय आपली न्यायालयेही त्यांना रुष्ट करणारे निर्णय देताना क्वचितच दिसणारी आहेत... या स्थितीत अगोदरच निर्णय न घेण्याची वृत्ती असलेल्या मुख्यमंत्र्यांना निर्णय घेणे अवघड होत असेल तर माणूस म्हणून त्यांची स्थिती सहानुभूतीने समजून घेता यावी अशी आहे. पण पृथ्वीराज चव्हाण हे साधे माणूस वा नागरिक नाहीत. ते मुख्यमंत्री आहेत आणि त्यांना अवघड निर्णय घेणे जमणेही गरजेचे आहे. अन्यथा त्यांचे थांबलेपण राज्याच्या थांबलेपणात परिणत झालेले पाहावे लागण्याची पाळी महाराष्ट्रावर येणार आहे... नेतृत्वाला नुसते स्वच्छ असून चालत नाही. त्याला अभिक्रमशीलही असावे लागते. नाहीतर ते फक्त टिकत असते, उमटत मात्र नाही.

**सुरेश द्वादशीवार**
१०१-ब, अंबर्डेकर संकुल, माधवनगर, नागपूर ४४००१०
sdwadashiwar@gmail.com
Mob.: 9822471646

*(ताज्या राजकीय घडामोडींच्या निमित्ताने परखड भाष्य करणारे 'सेंटर पेज' हे सदर, सुरेश द्वादशीवार खास 'साधना'साठी लिहिणार आहेत- महिन्यातून दोन वेळा. - संपादक)*

नामदेव माळी

# आणखी काही शाळा

सांगली, सातारा, पुणे, कोल्हापूर, परभणी, नंदुरबार या जिल्ह्यांतील शाळा गेल्या दीड वर्षांत बघितल्या. साधारणपणे कवायत, पाठांतराचे उपक्रम, कविता गायन, मानवी मनोरे, लेझीम पथक, झांजपथक, बोलके वर्ग, वृक्षारोपण, बाग बगीचा, हस्ताक्षर प्रकल्प, वाढदिवस साजरा करणे, गटपद्धतीचा वापर, स्वाध्याय कार्डस्‌चा वापर यांसारखे उपक्रम सर्वत्रच कमी–अधिक प्रमाणात दिसून येतात.

आणखी काही चांगल्या शाळा माझ्या बघण्यात आल्या. मिरज तालुक्यातील विकासनगरची शाळा. मनोज बनकर या शिक्षकानं सामान्यज्ञान वृद्धी, इंग्रजी शब्द समृद्धी, शुभेच्छा पत्रलेखन, कविता गायन, रोपवाटिका, पाखरांची शाळा हे उपक्रम राबविले आहेत. नंदुरबारमधील काळंबा शाळेतील वृक्षारोपण आणि स्वच्छता, परभणी जिल्ह्यातील माळीवाडा शाळेतील शुभेच्छापत्र, रात्रीची अभ्यासिका, वासंतिक शिबिर, कुंडी शाळेचा मुलाखतीचा उपक्रम– असे चांगले उपक्रम शाळांमध्ये दिसले. परंतु उपक्रमांची पुनरावृत्ती होत असल्यामुळे या शाळांच्यावर लिहिले नाही. काही शाळांमध्ये एखादा वेगळा उपक्रम दिसला; या शाळांतील शिक्षकांची धडपड, समाजभान दर्शविणाऱ्या घटना, कृती नोंदविणे आवश्यक वाटते म्हणून हा प्रपंच.

### झाडे आणि रद्दीला जिवंतपणा देणारी अवसरेनगर

पुणे जिल्ह्यात खेडशिवापूरच्या पश्चिमेस कोंढाणा किल्ल्याच्या पायथ्याला अवसरेनगरची शाळा आहे. उन्हाळ्यात पाण्याचे दुर्भिक्ष्य असते. झाडं तर जगली पाहिजेत. धुण्याभांड्याचं खरकटं पाणी आयाबाया साठवून ठेवतात. मुलं ते पाणी शाळेत घेऊन येतात. झाडाला घालतात. या मुलांना पाण्याचे व्यवस्थापन आणि जलसाक्षरता वेगळी शिकवण्याची आवश्यकता नाही. झाडं जिवंत राहिली ही गोष्ट वेगळीच. इतक्या कष्टातून जगवलेल्या, वाढवलेल्या झाडांविषयी मुलांच्या मनात नक्कीच प्रेम निर्माण होईल. शिवरायांच्या आज्ञापत्राचा अर्थ समजावून सांगावा लागणार नाही.

इथला हस्ताक्षर सुधारप्रकल्प तर जिल्ह्यानं स्वीकारलाय. सर्व मुलांची अक्षरं टपोरी आहेत. इथं अक्षर सुधारण्यासाठी दोनरेघी वह्यांऐवजी तीनरेघी वह्या वापरल्या जातात. अक्षराची उंची समान राखण्यासाठी या ओळींचा वापर केला जातो. वेलांटी आणि उकार शिकण्यासाठी, त्यांची उंची मर्यादित ठेवण्यासाठी या ओळींचा वेगळा वापर केलाय. उभी रेषा, आडवी रेषा, तिरपी रेषा, अक्षरांच्या वाट्या, रफाराच्या वाट्या, उकार, अर्धचंद्र या अवयवांचा प्रथम सराव केला जातो. नंतर पूर्ण अक्षर. शेवटी वेलांटी, उकार, मात्रा, रफार इत्यादींसह अक्षर. प्रत्येक मुलाजवळ शाईचा पेन आहे. सुरुवातीला कटनिबचा पेन वापरतात. त्यामुळे निब इकडे तिकडे वळत नाही. निबचा आकार अक्षराचे वळण ठरवतो. त्यानुसार बोटांची हालचाल होते. हाताला, बोटांना वळण लागते. आपोआपच अक्षरे वळणदार येतात. मुलांना मी श्रुतलेखनासाठी एक वाक्य दिलं. मुलं अत्यंत शांतपणानं लिखाण करत होती. घाई नाही, गडबड नाही, धांदरटपणा नाही. अक्षराच्या वळणाबरोबर मुलांनाही वळण लागत असेल काय?

गुरुजी म्हणाले, 'तुम्ही कुटुंबासह जलालपूरला चला, नाहीतर आम्ही मुलांना घेऊन जातो. जलालपूरजवळ मांडवा शिवारात बाबूरावांचा भाऊ राहत होता. त्याच्याकडे मुलं ठेवायची असं ठरलं. मुलांच्या पोटापाण्याची सोय काय? या तीन मुलांचा भार भावाला सोसणारा नव्हता. मुलं राहण्यापुरती, झोपण्यासाठी तिथं जातील. बाकी गुरुजी बघतील असं ठरलं. मुलं गुरुजींबरोबर आली. शाळेत रमली. मांडवा शिवारात चुलत्यांच्या घरात राहायचं. तिथून मुलं मांडवा जलालपूर फाट्यावर यायची. गुरुजी ऑटोतून जलालपूरहून यायचे. फाट्यावर मुलांना ऑटोमध्ये घ्यायचे. शाळा सुटल्यावर जाताना मुलांना फाट्यावर सोडायचे. हंसकुमार आडते, सुरेखा जाधव, मीरा मारवाडे, रवींद्र फाळके हे चार शिक्षक घरून शाळेत येताना जादा डबा आणायचे. आपल्या डब्यातले मुलांना खाऊ घालायचे. रात्रीच्या जेवणाचा डबा भरायचे. दप्तर, वह्या, पुस्तकं, साबण, सोडा इत्यादींचा खर्च करायचे. दिवाळीच्या सुट्टीत काय करायचं हा प्रश्न पडला. गावकऱ्यांनी भार उचलला. धान्य दिलं. एक घास काऊचा, एक घास चिऊचा. एकमेकां साह्य करू, अवघे धरू सुपंथ हे शाळेतल्या मुलांनी याचि देही याचि डोळा अनुभवलं असेल, नाही का?

मग गुरुजींनीच एक अनुभव सांगितला. गणेशचं अक्षर सुधारत नव्हतं. तो राहायचाही अव्यवस्थित, अस्वच्छ. मग गुरुजींनी पहिल्यांदा त्याच्या राहण्या-वागण्यात सुधारणा घडवून आणली. त्यासाठी पालकांची मदत घेतली. आज गणेशचं अक्षर त्याच्याइतकंच सुंदर आहे. आपल्या मन:स्थितीप्रमाणे अक्षर बदलतं. गोंधळलेल्या अवस्थेत अक्षरही गिचमीड असणार, नाही का!

आणखी एक गोष्ट. अवसरेनगरची विविध विषयांवर कात्रणपुस्तकं. मी संग्रहांऐवजी पुस्तक असं म्हटलं. याचं कारण या पुस्तकांची बांधणी वेगळ्या प्रकारची आहे. वहीऐवजी खोक्यांच्या पुठ्ठ्याला बॉक्सफाईलसारखा आकार दिला जातो. आत पुठ्ठ्याच्या मापाचे कागद चिकटवले जातात. हे वापरलेले कागद असतात. जुन्या लग्नपत्रिकांचा, सेलोटेपचा मजबुतीसाठी आणि सौंदर्य वाढविण्यास उपयोग केला जातो. विज्ञानविश्व, आकड्यांची किमया, एक तरी छंद जोपासावा, ऐका माझा विनोद, माझी फजिती असे चाळीस संग्रह रॅकमध्ये आहेत. या कोपऱ्याला वाचनकोपरा असं नाव दिलंय. इथं वाचनविषयक सुविचार पट्ट्या लावल्या आहेत. 'वाचन हा स्वयंअध्ययनाचा आत्मा आहे, त्याला टाळून ज्ञानमार्गाची वाटचाल कशी होणार?' ही पुस्तके शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी मिळून केली आहेत. या पुस्तकांनी विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडणार आहेच, शिवाय शब्दसंपत्ती वाढणार आहे. मनोरंजन होतंय, अध्ययन अध्यापनही आनंददायी होतंय.

या वाचनकोपऱ्यात आणखी एक गोष्ट आहे, घडीचित्र. रद्दीतील चित्रे. एका एका विषयावरील चित्रांची मालिका. स्कूल चले हम, झेंडा राहो नभी भिडणारा अशा वर्तमानपत्रातील मालिकांच्या फोटोंचा अभ्यासासाठी आणि शिकण्यासाठी गुरुजींनी छान वापर केलाय. Look, Read, Learn हे घडीचित्र उत्तम नमुना आहे. वर्तमानपत्रातील उत्तम, आकर्षक चित्रांचा गुरुजींनी खुबीने वापर केलाय. चित्रं जिवंत होतात. चित्रांखाली गुरुजींनी समर्पक शब्द, वाक्ये लिहिली आहेत. I Am playing football, Hands up, Crying, Sad बघणाऱ्याच्या मनामध्ये आपोआप भाव उमटतात. चित्रं जिवंत होऊन बघणाऱ्याशी बोलू लागतात. चित्र म्हणजे बिनशब्दांची कविता असं का म्हणतात ते इथं समजतं. मनात मराठीमध्ये, मातृभाषेत विचार सुरू होतो. चित्राखालील शब्द, वाक्य आपला विचार इंग्रजीकडे वळवते. रद्दी, थोडासा डिंक आणि स्केचपेनचाच काय तो खर्च.

कृष्णा कुदळे आणि जगदाळे या मावळ्यांनी कोंढाण्याच्या पायथ्याला झाडा-फुलांबरोबर मुलांची मनंही फुलवली आहेत. आसपासच्या शाळांमध्येही कृष्णा कुदळे मुलांचे हस्ताक्षर सुंदर करण्यासाठी धडपडतात. सुंदर हस्ताक्षराचे धडे गिरवलेली मुले गुरुजींना आपल्या सुंदर हस्ताक्षरात पत्र पाठवतात. कुदळे गुरुजींच्या मुलांनी जि.प.अध्यक्षांना, पदाधिकाऱ्यांना, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना आपल्या देखण्या, टपोऱ्या, कोरीव अक्षरात पत्रं पाठविली आहेत. शाबासकीची थाप मिळविली आहे.

**कला, कार्यानुभवाने सजलेली मोरावळे**

जावळी तालुक्यातील ही हिरवी शाळा. बालसभा, नाट्यीकरण, भारतीयम्, साहित्य कवायत, वर्गाप्रमाणे. आणि बोलकी, हसरी, नाचरी मुले आणि प्रेमळ शिक्षक ही या शाळेची वैशिष्ट्ये. या शाळेत परिपाठाला पुस्तकाचं क्रमश: वाचन केलं जातं. आजपर्यंत एक होता कार्व्हर, श्यामची आई, शाहू महाराजांच्या कथा, महर्षी बाबा आमटे या पुस्तकांचं वाचन झालेय. विद्यार्थ्यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेला २०० पुस्तके भेट मिळाली आहेत.

या शाळेतल्या वर्गखोल्या शैक्षणिक साहित्यांनी भरल्या आहेत. विकत आणलेलं किंवा गोळा केलेलं साहित्य नव्हे. शिक्षक आणि अगदी पहिली दुसरीपासूनच्या विद्यार्थ्यांची नवनिर्मिती आहे ही. वर्गखोल्यातले कट्टे आणि कोपरे कला, कार्यानुभवाचे साहित्य आणि शैक्षणिक साधनांनी भरले आहेत. कागदी प्लेटांपासून शैक्षणिक चेंडू, आकाशकंदील केले आहेत. कोणत्या महिन्यात कोणते साहित्य करायचे याचे नियोजन आहे. जूनमध्ये हातरुमाल, जुलैमध्ये कागदी पिशव्या, सप्टेंबरमध्ये शिकेकाई शाम्पू, ऑक्टोबरमध्ये अक्षता, डिसेंबरमध्ये की चेन, जानेवारीमध्ये फ्लॉवर पॉट, ऑगस्टमध्ये राख्या, याशिवाय जुन्या साड्यांपासून पायपुसणी. कलाकुसर इतकी चांगली की पायपुसणीवर पाय ठेवावे की नको वाटावं, समारंभात खिशाला लावण्याचे बिल्ले, मुखवटे, आईस्क्रीम कांड्यापासून शोभेच्या वस्तू, काय काय केलंय मुलांनी! दैनंदिन वापरामध्ये लागणाऱ्या वस्तू बाजारातून विकत आणल्या जातात. त्या वस्तू आपण स्वत: करू शकतो. तेसुद्धा अगदी कमी किंमतीत. पुन्हा टाकाऊ वाटणाऱ्या, निरुपयोगी वाटणाऱ्या रद्दी कागद, जुन्या साड्या या वस्तू वापरून. स्वनिर्मितीचा आनंद वेगळाच. उद्याच्या जगातले छोटे कारागीर, कलाकार, उद्योजक या शाळेत घडत आहेत.

शाळेत रक्षाबंधनाचा कार्यक्रम केला जातो. त्याला मुलांनी केलेल्या राख्या वापरल्या जातात. वाढदिवसाला भेटकार्डं दिली जातात. शाळेस भेट देणाऱ्या पाहुण्यांना विद्यार्थ्यांनी केलेले बुके दिले जातात.

**मुलांना आणि गावाला जीव लावणारी जलालपूर**

परभणी जिल्ह्यातील जलालपूरची शाळा. डिसेंबर २०११ मध्ये या शाळेला भेट दिली. इयत्ता पहिली ते सातवीची शाळा. पटसंख्या १३२, शिक्षक चार. लेखन, वाचन, विषय तयारी या बाबी उत्तम. याचं कारण इथं मुलं गटात शिकवतात. शाळेतून घरी गेल्यानंतर अभ्यास करण्यासाठी वेगळे गट आहेत. हे गट ठरलेल्या घरात अभ्यासाला बसतात. त्यावर पालक लक्ष ठेवतात.

गुरुजी वेगळ्या कामात असताना गटप्रमुख अभ्यास घेतो. लेखन, वाचन, गणितक्रिया इत्यादी. गुरुजी शाळेत नसताना मॉनिटर गुरुजी होतो. गुरुजी शिकवतात तसा शिकवलेला भाग परत शिकवतो.

निवडणुकीचा आदला दिवस. गटशिक्षण अधिकारी झोनल ऑफिसर होते. निवडणुकीच्या आदल्या दिवशी शाळेला सुट्टी असते. साहेब निवडणुकीच्या कामासाठी शाळेत गेले तर शाळा सुरू. गुरुजी शाळेत सापडेनात. मग लक्षात आलं, इथं शाळा चालवायला छोटे गुरुजी समर्थ आहेत.

शाब्दिक खेळ, इंग्रजी-गणित पेटीतले खेळ, कविता गायन यांत मुलं खूपच उत्साही दिसली. बेंदराला केलेले बैल लॉफ्टवरून मुलांच्याकडे बघत होते. कदाचित बैलांनाही वाटत असणार की, आपणही मूल होऊन नाचावं.

शिवाय मानवी मनोरे पथक, योगासन पथक, लेझीम पथक, सूर्यनमस्कार पथक, रोपवाटिका आणि महत्त्वाचे म्हणजे इथले बँडपथक. शेरेवाडीच्या बंटीसारखा या शाळेतला पांडू बँड साहित्य वाजवण्यात रमतो. ही दिसायला छोटी गोष्ट वाटत असली तरी ती तेवढी साधी नाही. मूल अपंग असणं म्हणजे काय? ते मतिमंद असलं तर काय वाटतं? आई-वडिलांना काय यातना भोगाव्या लागतात? याचा बारकाईनं विचार केला की, ही छोटी वाटणारी गोष्ट किती मोठी आहे हे समजतं. काही वेळा असं मूल आई-वडिलांनाही नकोसं झालेलं असतं. अशा मुलाच्या आयुष्यात आनंद भरतात गुरुजी. बेरंग झालेलं आयुष्य रंगीबेरंगी करतात. निसर्गानं हिरावलेलं बालपण त्याला परत देतात. अशी अपंग मुलं शाळेत आली नाहीत तर स्वत:ला माणसं समजणाऱ्या गावातल्या जनावरांची शिकार होतात. त्यांची टोकाची चेष्टा केली जाते. त्यांना वेडं ठरवलं जातं. त्यांना माणसात आणण्याचं काम गुरुजी आणि शाळेतील छोटी मुलं करतात. ही मुलं कृतीतून संवेदना, सहवेदना, सहकार्य, प्रेम, माया शिकतात. जलालपुरातील लेझीम पथकातील मुलं नाचतात त्या वेळी पांडूचा स्वतंत्र नाच सुरू असतो. तो मतिमंद आहे, पण त्याच्या मानसिक क्षमतांचा गुरुजी १०० टक्के वापर करत आहेत. पांडूही उत्तम प्रतिसाद देतो. त्याला १०० पैकी १०० गुण का देऊ नयेत?

इथलं बँडपथक आणखी वेगळ्या कारणासाठी प्रसिद्ध आहे. गणेशउत्सव, नवरात्र, गावाचा सप्ताह, जनजागृती फेऱ्या यांमध्ये शाळेचा बँड वाजतो, यात काही नवल नाही. परंतु एखाद्या गरिबाच्या घरी लग्नकार्य असतं. बँडपथकाला पैसे देऊन लग्नात बेंडबाजा वाजविण्याची ताकद नसते. अशा वेळी शाळेचं पथक तिथे हजर असतं. ढोल, साईड ड्रम, तडम ताशा, बासरी, मोरॅक्स, हलगी, घेऊन मुलं हजर होतात. अर्धा पाऊण तास आपली कला सादर करतात. लग्न साजरं होतं. मिळेल ते बक्षीस स्वीकारून मुलं परत शाळेत रमतात.

शाळेत बचत बँक आहे. तिथे मुलं पैसे साठवतात. शाळेत साहित्य भांडार आहे. इतर ठिकाणांपेक्षा इथं शालेय साहित्य स्वस्त मिळतं. ना नफा ना तोटा, या तत्त्वावर साहित्य भांडार चालतं. स्वत:च्या हाताने साहित्य घ्यायचं आणि पैसे डब्यात टाकायचे. प्रामाणिकपणा शिकविण्यासाठी वेगळा पाठ घेण्याची गरज नाही. एखाद्याकडे पैसे नसतील तर बचत बँक मदतीला आहेच.

मला या शाळेची वेगळीच गोष्ट सांगायची आहे. दारूचा धंदा बंद केल्याची गुरुजींची करामत. गावात तंटामुक्ती समिती गठित करायची होती. बैठक सुरू झाली. गावातल्या काही महिला तिथे आल्या. त्या म्हणाल्या- 'गावातला दारूचा धंदा बंद करा, त्याशिवाय तंटा बंद होणार नाही.' खरं होतं महिलाचं. शेतातून पुरुष घरी आले की त्यांचे पाय वासाचा शोध घेत जायचे. जेवायला ताटावर बसलं की, हात धुवून आलोच असं म्हणून उठलेला पुरुष घोटभर घ्यायला जायचा. हे गुरुजींना पटलं. गुरुजी पुढे झाले. निर्णय झाला. दारूचा धंदा बंद. पण दारू विकणारे गृहस्थ गरीब. थोडंसं अंधत्व. बाहेरून आणून दारू विकायचे. त्यांच्या पोटावर पाय आला, पण गावापुढे इलाज चालेना. तो गुरुजींच्याकडे आला. म्हणाला, 'माझ्या मुलाचा दाखला द्या. पोरांना कसं शिकवू? माझं पोट कसं भरू? हंसकुमार आडते. मुलांचे पालक गुरुजी. म्हणाले, 'किती दिवस झाले धंदा करताय? या अगोदर कसं जगत होता? काय फरक पडला जगण्यात? मुलांच्या शिकण्याची काळजी करू नका. आजपासून तुमचा मुलगा आमचा झालाय. आज मुलगा तुमच्या घरी येणार नाही.' अर्थातच मुलाच्या आईची संमती गुरुजींनी घेतली होती. गुरुजी मुलाला आपल्या घरी परभणीला घेऊन गेले. तो सोमवारचा दिवस. त्या दिवशी मुलाच्या वडिलांचा उपवास होता. रात्री त्यांनी उपवास सोडला नाही. उपाशी झोपले. दुसऱ्या दिवशी शाळेत आले. मुलगा परत द्या म्हणाले. या गुरुजींशी वाद घातलेल्या पालकांनी पाच सप्टेंबरला स्वत: शिक्षकांचा सत्कार केला. आज संतोष इटोलीच्या आश्रमशाळेत शिकतोय. त्याच पालकांची मुलगी मतिमंद. तिलाही गुरुजींनी मतिमंदांच्या शाळेत प्रवेश मिळवून दिला.

मी गुरुजींना म्हटलं, 'हे सगळं करताना तुम्हाला आपल्या अंगावर काहीतरी बालंट येईल. दारुडे त्रास देतील असं वाटलं नाही का? भीती वाटली नाही का?'

गुरुजी म्हणाले, 'गावकऱ्यांशी आमची इतकी जवळीक आहे, की एखाद्याशी वाद झाला तरी गावकरी आमचीच बाजू घेतात. आम्ही त्यांच्या सुख-दु:खात सहभागी होतो. गावात कोणी आजारी पडलं तर आम्ही सर्वजण त्यांना भेटायला जातो. या गावाच्या रोहिदास टेकाळेंना परभणीला ॲडमिट केलं. त्यांना दुसऱ्या दवाखान्यात हलवावं लागलं. नंतर नांदेडच्या दवाखान्यात नेलं. आडते गुरुजी प्रत्येक ठिकाणी गेले. धडपड केली. मदत केली. गावात ग्रामस्वच्छता अभियान सुरू झालं. गुरुजींनी सांगताच रोहिदास टेकाळ्यांनी प्रथम संडास बांधला.

गावाच्या प्रसंगात गावकरी गुरुजींना बोलावतात. गुरुजी तुम्ही

यात लक्ष घाला म्हणतात. आजच्या काळात अविश्वसनीय, काल्पनिक वाटावं असं हे सारं आहे. सर्व शिक्षकांची एकजूट आणि तळमळ यामुळे हे शक्य झालंय.

दुसरं उदाहरण– बाबूराव गायकवाड. भिल्ल माणूस. मुक्त, भटका. आज इथं उद्या तिथं. पोट नेईल तिकडे पाय जातात. कुटुंब जलालपुरात नदीकाठाला उतरलं. मिळेल ते काम आणि शिकार यांवर गुजराण. भरत, शत्रुघ्न आणि गीता ही त्यांची तीन मुलं गुरुजींनी शाळेत आणली. रानावनात भटकणारी, उघडीवाघडी फिरणारी मुलं स्वच्छ राहू लागली. शाळेचा गणवेश घालू लागली. छान छान दिसू लागली. कविता गाऊ लागली. मुलं तिसरीत गेली आणि कुटुंबाचं अचानक स्थलांतर झालं. गुरुजी शोधाशोध करू लागले. माहिती मिळेल त्या गावाला जाऊ लागले. एकदाचा ठावठिकाणा लागला. जलालपूरपासून तीस किलोमीटरवर कौसडी गाव. गावापासून तीन किलोमिटर बाबूराव गायकवाडांचे झोपडे. मुलांचा अवतार बदललेला, कपडे मळकटलेले, फाटलेले, केस वाढलेले.

गुरुजी म्हणाले, ‘तुम्ही कुटुंबासह जलालपूरला चला, नाहीतर आम्ही मुलांना घेऊन जातो. जलालपूरजवळ मांडवा शिवारात बाबूरावांचा भाऊ राहत होता. त्याच्याकडे मुलं ठेवायची असं ठरलं. मुलांच्या पोटापाण्याची सोय काय? या तीन मुलांचा भार भावाला सोसणारा नव्हता. मुलं राहण्यापुरती, झोपण्यासाठी तिथं जातील. बाकी गुरुजी बघतील असं ठरलं. मुलं गुरुजींबरोबर आली. शाळेत रमली. मांडवा शिवारात चुलत्यांच्या घरात राहायचं. तिथून मुलं मांडवा जलालपूर फाट्यावर यायची. गुरुजी ऑटोतून जलालपूरहून यायचे. फाट्यावर मुलांना ऑटोमध्ये घ्यायचे. शाळा सुटल्यावर जाताना मुलांना फाट्यावर सोडायचे. हंसकुमार आडते, सुरेखा जाधव, मीरा मारवाडे, रवींद्र फाळके हे चार शिक्षक घरून शाळेत येताना जादा डबा आणायचे. आपल्या डब्यातले मुलांना खाऊ घालायचे. रात्रीच्या जेवणाचा डबा भरायचे. दप्तर, वह्या, पुस्तकं, साबण, सोडा इत्यादींचा खर्च करायचे. दिवाळीच्या सुट्टीत काय करायचं हा प्रश्न पडला. गावकऱ्यांनी भार उचलला. धान्य दिलं. एक घास काऊचा, एक घास चिऊचा. एकमेकां साह्य करू, अवघे धरू सुपंथ हे शाळेतल्या मुलांनी याचि देही याचि डोळा अनुभवलं असेल, नाही का?

मुलांचा वनवास संपला नाही. बाबूरावाचं पुन्हा त्याच्या मूळ गावी स्थलांतर झालं. बाबूराव भरकटत आपल्या गावी १५० कि.मी.वर जालना जिल्ह्यात गेले. कधी ऊसतोड तर कधी मजुरी. मुलांचीही भटकंती झाली. आज परत ते जलालपूरमध्ये आलेत. मुलांचं शिक्षण सुरू आहे.

जे शाळेत येऊ शकतात त्यांना शिकवणं सोपं, पण जे येऊ शकत नाहीत त्यांना शाळेत आणणं, आलेल्यांना शिकवणं आणि शिकणाऱ्याला शाळेत टिकवणं महत्त्वाचं. त्यासाठी जीव लावावा लागतो.

सांगली जिल्ह्यातील (तालुका मिरज) गुंडेवाडी, आरग, मालगाव, एरंडोली, डोंगरवाडीसारख्या शाळांमध्ये शिक्षक, पारधी मुलांना असाच लळा लावत आहेत. समाजाने यांच्यावर गुन्हेगारीचा शिक्का मारलाय, सरकारने यांना राहण्यासाठी गावं नेमून दिली, पण गावानं यांना स्वीकारायला हवं ना! जे हाल धरणग्रस्तांचे त्यापेक्षा जास्त पारध्यांचे. यांना पाणी मिळायचं बंद केलं की आपोआपच गाव सोडतात. घोटभर पाण्यासाठी झगडा. मग डोंगरात, कड्याकपारीत चुळकाभर पाणी शोधण्यासाठी वणवण भटकणं. पुन्हा गाव सोडणं. डोकं टेकायला हक्काची जागा हवी. राहण्यासाठी घर हवं. रेशनकार्ड हवं, मतदारयादीत नाव हवं. भारताच्या नागरिकत्वाचा पुरावा हवा. यासाठी धरणं, आंदोलनं सुरू असतात. आणि शाळेत त्यांची मुलं मोडक्यातोडक्या मराठीत प्रतिज्ञा म्हणतात. शाळेनं मुलांना घट्ट पकडलंय. डोंगरवाडीच्या मुलांना शाळेला रोज येणं होत नाही. तरीही चार-पाच किलोमीटर वाट तुडवत शाळा गाठतात कधीमधी.

एकेकाळी मद्यपी गुरुजींना वैतागून गावानं डोंगरवाडी शाळेला कुलुपं घातली होती. तीच शाळा आज डिजिटल झालीय, हिरवीगार झालीय. गावाला शाळेचा लळा लागलाय. शाळेच्या नावाने गावाची ओळख होतेय. आज जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये अनाथ मुलं, महिला सेक्स वर्कर्सची मुलं, एडस्‌ग्रस्त पालकांची तसेच एच.आय.व्ही. बाधित मुलंही शिकत आहेत.

शेरेवाडीचे बंटीचे गुरुजी आता वीटभट्टीवरच्या मुलांना आपल्या गाडीवरून रोज शाळेत आणतात. बंटी आता गावातल्या भजनीमंडळात तबल्याचा ठेका धरतोय. मोरावळेच्या शाळेतला मूकबधिर असणारा सुनिल ढोकळे सातवीतून आठवीत गेलाय. तो हायस्कूलमध्ये शिकतोय. सांस्कृतिक कार्यक्रमांत भाग घेतोय. शाबासकी मिळवतोय. धावण्याच्या शर्यतीत विजेता होतोय. तुंगच्या शाळेतील रजनी आपल्या गोड गळ्याने मंत्रमुग्ध करतेय. आणि सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे व्यंग विसरून आनंदाचे क्षण मुठीत पकडायला शिकताहेत ही बाळं.

असा शाळेचा लळा मुलांइतकाच गावालाही लागायला हवा. असं झालं तर मुलेच काय, पण गावकरीही आचार्य अत्रे यांची कविता आनंदाने गातील.

हीआवडते मज मनापासूनी शाळा
लावीते लळा जसा माऊली बाळा.

**नामदेव माळी**
‘आई’, वृद्धसेवाश्रमासमोर, उत्कर्षनगर, कुपवाड रोड, सांगली ४१६४१६.
namdeosmali@gmail.com
Mob. 9423869404

*(या लेखाबरोबरच ‘शाळा भेट’ ही लेखमाला समाप्त झाली आहे. ही संपूर्ण लेखमाला जूनमध्ये पुस्तकरूपाने प्रकाशित होईल. – संपादक)*

डॉ. दिलीप शिंदे

# कॅलक्युलेटेड मॅडनेस

ते आपल्या आईला असं म्हणाले होते की, 'मला जर काही जमलं नाही तर मी ड्रायव्हर होईन. पण नाटकाच्या बसचा ड्रायव्हर होईन. दुसरं काही चालणार नाही.' हा संदर्भ देऊन मी त्यांना त्यांच्या ह्या मॅडनेसबद्दल विचारले होते. त्यावर अतुल कुलकर्णी ह्यांनी मलाच उलट प्रश्न विचारला होता की, 'मी तेव्हा असं म्हणालो होतो हे खरं आहे. पण खरोखरच ड्रायव्हर होण्याची वेळ माझ्यावर आली असती तर तुम्ही मला आज इथं मुलाखतीसाठी बोलवले असते का?' कोणत्याही क्षेत्रामध्ये यशस्वी होण्यासाठी माणसाजवळ मॅडनेस जरूर असायला हवा. पण तो कॅलक्युलेटेड मॅडनेस असायला हवा. आपल्याला आपल्या क्षमतांची पुरेपूर जाणीव असायला हवी. नाहीतर पुढे आयुष्यभर अशी कुचंबणा अथवा फरफट सोसावी लागते.

''सर अभिनंदन, परवाचा कार्यक्रम छान झाला. तुम्ही खूप सुंदर मुलाखत घेतलीत.''

''अरे मुलाखत कसली, मी केवळ त्यांना बोलतं केलं. अतुल कुलकर्णी छान बोलले ना!''

''त्यांची मतं किती ठाम आणि परखड आहेत.''

''ते केवळ उत्तम अभिनेतेच नाहीत, अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग असतो. साताऱ्याजवळ वनकुसवडे या गावी डोंगरमाथ्यावर त्यांनी शेतजमीन घेतली आहे. गेली आठ वर्षे ते तेथे जंगल वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. 'क्वेस्ट' संस्थेच्या माध्यमातून ते शैक्षणिक क्षेत्रामध्येही काम करत असतात. मुंबईसारख्या शहरात इकोफ्रेंडली जीवनशैली अंगीकारण्याच्या मोहिमेत त्यांचा पुढाकार असतो.'' मी उत्साहाने जितेंद्रला सांगितले.

सांगलीतील आम्ही काही फॅमिली डॉक्टरांनी मिळून 'संवेदना' ही संस्था स्थापन केली आहे. गेली दहा वर्षे या संस्थेच्या माध्यमातून आम्ही अनेक उपक्रम राबवीत आलो आहोत. या वर्षी प्रसिद्ध अभिनेते अतुल कुलकर्णी यांची 'सामाजिक स्वास्थ्यरक्षण आणि आपली जबाबदारी' या विषयावर मुलाखत आयोजित केली होती. या कार्यक्रमाला लोकांचा भरघोस प्रतिसाद लाभला होता. स्थानिक वृत्तपत्रांनीही चांगली प्रसिद्धी दिली होती. आम्ही सर्व संयोजक खूष होतो.

या कार्यक्रमासाठी माझे बरेचसे पेशंटही उपस्थित होते. दवाखान्यात आल्यावर ते आपली प्रतिक्रिया आवर्जून सांगायचे. जितेंद्रही त्या कार्यक्रमाला आला होता.

''तुला तुझ्या दुकानाच्या व्यापातून कशी काय सवड मिळाली होती?'' मी त्याला उत्सुकतेने विचारले .

''मी अतुल कुलकर्णींचा फॅन आहे. यापूर्वी मी त्यांना एकदा भेटलो आहे. पन्हाळ्याला आमचे एक शिबिर होते. त्या शिबिरासाठी ते मार्गदर्शक म्हणून आले होते. कॉलेजमध्ये असताना मला अभिनयाची खूप आवड होती. नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा, दिल्ली यांच्या वतीने आपल्याकडे एक राष्ट्रीय पातळीवरील नाट्य प्रशिक्षण शिबिर झाले होते. त्यासाठी माझी निवड झाली होती. एरवी अशी शिबिरे केवळ दिल्ली आणि गोव्यालाच होत असतात. सांगली ही नाट्यपंढरी असल्यामुळे आपल्याकडे ते एक वेळ आयोजित केले होते.'' नेहमी अस्वस्थ आणि घाईगडबडीत असणारा जितेंद्र आज मात्र भारावल्यासारखा बोलत होता. ते पाहून मला नवल वाटले.

''कार्यक्रमानंतर तू त्यांना भेटलास की नाही?''

''नाही. मला लगेच दुकानाकडे परत यावे लागले. सायंकाळी सात नंतर दुकानात गर्दी असते. वडिलांची एकट्यांची खूप धावपळ होते. अतुल कुलकर्णी इंजिनिअरिंग अर्ध्यात सोडून अभिनय क्षेत्राकडे वळले ना?'' त्याने कुतूहलाने विचारले.

‘‘होय. त्यांची एकूण जडण-घडण आणि शैक्षणिक वाटचाल उद्‌बोधकच आहे.’’ मी म्हणालो, ‘‘तुझी तब्येत कशी आहे?’’

‘‘तुम्ही सांगितल्याप्रमाणे आम्ही न्यूरॉलॉजिस्टकडे जाऊन आलो. त्यांनी ईसीजी वगैरे बऱ्याच तपासण्या केल्या. त्यांमध्ये काही विशेष दोष नाही म्हणाले. मायग्रेनमुळेच मला हा त्रास होतो आहे, असे त्यांनीही सांगितले. एक महिन्याची औषधे आणि इंजेक्शने लिहून दिली आहेत. आठवड्यातून एक असे तुमच्याकडून इंजेक्शन टोचून घ्यायला सांगितले आहे.’’ त्याने रिपोर्टची फाईल आणि इंजेक्शन माझ्याकडे दिले.

‘‘तुझे बाबा कुठे आहेत?’’

‘‘ते दुकानात थांबले आहेत. नंतर येऊन तुम्हांला भेटतो म्हणाले आहेत.’’

‘‘आता तरी तुझ्या मनातली शंका दूर झाली की नाही?’’ मी त्याचे रिपोर्ट पाहत पाहत त्याला विचारले. त्यावर तो काही बोलला नाही. मी त्याला त्यातील एक इंजेक्शन दिले.

गेली चार-पाच वर्षे जितेंद्र महिन्या दोन महिन्यांतून एकदा तरी हमखास माझ्या दवाखान्यात यायचा. ‘डॉक्टर, माझं डोकं खूप दुखू लागलं आहे. मला अगोदर एक इंजेक्शन द्या’ म्हणून हट्ट धरायचा. त्याला अर्धशिशीचा त्रास आहे. शारीरिक व मानसिक ताणामुळे त्याला हा त्रास होतो आहे. इथल्या मुख्य चौकात त्याचे डिपार्टमेंट स्टोअर आहे. दुकान जोरात चालते. त्यामुळे तो नेहमी गडबडीत असतो. त्याच्या ह्या नेहमीच्या तक्रारीमुळे त्याचे वडीलही त्याच्यावर वैतागले आहेत. ‘त्याच्या एकदा सर्व तपासण्या करून बघू या’ असे मला ते परवा आग्रहाने म्हणाले. म्हणून त्या दोघांच्याही मनातील शंका दूर करण्यासाठी मी त्यांना न्यूरॉलॉजिस्टचा सल्ला घेण्याबाबत सुचविले होते. त्यानुसार ते न्यूरॉलॉजिस्टना भेटून आले होते.

‘‘तू काही व्यायाम वगैरे करतोस की नाही?’’ मी त्याला मुद्दाम विचारले.

‘‘व्यायाम करायला सवड कुठे असते सर? सकाळी साडेसहा वाजता दुधाची गाडी येते. त्या अगोदर येऊन दुकान उघडावे लागते. रात्री थेट साडेदहा-अकरा पर्यंत दुकान सुरू असते. वडील सकाळी खरेदीचे बघतात. आमच्याकडे एकूण जवळजवळ सातशे जिन्नस आहेत. गिऱ्हाइकाला परत पाठवून चालत नाही. आमच्या व्यवसायातही हल्ली खूप स्पर्धा सुरू झाली आहे. दुपारी वडील आले की थोडावेळ जेवायला जातो. सायंकाळी चार वाजता पुन्हा दुकानात परत यावे लागते.’’

‘‘तुम्ही आठवड्यातून एक दिवस सुट्टी का घेत नाही?’’

‘‘वडील ऐकायला तयार नाहीत. त्यांनी दुकान सुरू केल्यापासून हे असेच सुरू आहे. रविवारी सुट्टी घ्यावी म्हटले तर उलट रविवारी दुकानात जास्त गर्दी असते. त्यामुळे घरी काही महत्त्वाचा कार्यक्रम वगैरे असला तरच सुट्टी. वडिलांना काही सांगायला गेले तर लगेच चिडतात. ‘मी किती कष्टाने हे सर्व उभे केले आहे, तुला त्याची जाणीव नाही’ म्हणतात. एक तर मला त्यांनी अर्ध्यातून कॉलेज सोडायला लावून दुकानात बसवले आहे. अभिनय क्षेत्रामध्ये करिअर करण्याची माझी खूप इच्छा होती.’’ जितेंद्र अस्वस्थपणे म्हणाला. अतुल कुलकर्णींची मुलाखत ऐकून तो एवढा का भारावला होता हे आता माझ्या लक्षात आले.

‘‘हे बघ जितेंद्र, आपण आपला व्यवसाय सांभाळूनही आपली आवड जोपासू शकतो. प्रत्येकाला करिअर करण्यासाठी आपल्या आवडीचे क्षेत्र मिळतेच असे नाही. त्यामुळे मिळेल त्या क्षेत्रातही आपल्याला आवड निर्माण करता यायला पाहिजे. मलाही साहित्यक्षेत्रामध्ये आवड आहे. म्हणून तर मी माझा वैद्यकीय व्यवसाय सांभाळून असे कार्यक्रम आयोजित करीत असतो. वाचन, लेखन सुरू असते.’’ मी त्याला समजावीत म्हणालो.

‘‘तुमचं ठीक आहे सर, पण माझा अख्खा दिवस दुकानात पुड्या बांधण्यात जातो. काउंटरवरून जरासुद्धा हलता येत नाही. कोणी एखादी वस्तू ढापली तर पन्नास-शंभर रुपयांना फटका बसतो. लोकांना हल्ली थांबायलाही वेळ नसतो. एखाद्या वेळी अशी मुद्दाम सवड काढून कार्यक्रमाला किंवा नाटक-सिनेमाला गेलो तर त्याने हुरूप येण्याऐवजी उलट अस्वस्थ वाटू लागते. आपली साईड चुकली आहे, याची बोच मनाला कुरतडू लागते. बायकोलाही नाटक-सिनेमात फारसा रस नाही. उगीच माझं मन राखायचं म्हणून सोबत येते. लौकिकार्थानं आज मी सुखी आहे सर. मुख्य चौकात दुकान आहे. बंगला आहे, गाडी आहे. समजूतदार बायको आहे. पण या सर्वांमध्ये माझी घुसमट होते आहे. माझी एक मैत्रीण सध्या टी.व्ही. सीरीयलमध्ये काम करते आहे. आमचं दोघांचं अफेअर होतं. पण मला अर्ध्यातून कॉलेज सोडावं लागल्यामुळं मी तिला भेटायचं बंद केलं. शेवटी आमच्या ग्रुपमधल्या एका मुलाबरोबर तिनं लग्न केलं.’’ तो आवंढा गिळत म्हणाला. त्याच्या मनातले हे गुपित ऐकून मी चकित झालो. त्याची अशी काही ट्रॅजिडी असेल याची मी कल्पनाही केली नव्हती. गेली चार-पाच वर्षे तो माझ्याकडे पेशंट म्हणून येतो आहे. पण आज प्रथमच इतक्या मोकळेपणानं माझ्याशी बोलत होता.

‘‘जितेंद्र, तुझी व्यथा मी समजू शकतो. पण असं हताश होऊन आणि परिस्थितीला बोल लावून चालणार नाही. तुला स्वतःला यातून सावरायला हवं. त्याशिवाय तुझा हा मायग्रेनचा त्रासही कमी होणार नाही. मी तुला एक प्रश्न विचारतो, तुम्ही किती मुलं त्या वेळी नाट्य प्रशिक्षण शिबिरामध्ये सहभागी झाला होता?’’

‘‘आमची पन्नास मुलांची बॅच होती.’’

‘‘त्यांपैकी किती मुलांनी अभिनय क्षेत्रात करिअर केलं आहे?’’

''दोघे-तिघेजणच सध्या मुंबईमध्ये असतात.'' त्याने आठवून सांगितले.

''मग आता तूच विचार कर. हौस आणि करिअर यामधला फरक आपल्याला ओळखता यायला पाहिजे. आज जर तू केवळ अभिनय क्षेत्रामध्ये करिअर करायचे ठरविलेस तर आत्ता तुला ते शक्य आहे का? तू वेळेचं नियोजन कर. वडिलांना पटवून आठवड्यातून एक दिवस सुट्टी घ्यायला सुरुवात कर. बदलत्या काळानुरूप व्यवसाय पद्धतीमध्ये बदल कर. काही नवीन कल्पना राबव. शेवटी पोटापाण्याचा उद्योग म्हणून तुला तुझा व्यवसाय जिद्दीने करायलाच हवा आणि हे सर्व करत असताना तू अभिनयाशीही मैत्री जपू शकतोस. हवं तर दुकानात मदतीला एक-दोन कामगार घे.''

''आम्ही शेजारचा दुकानगाळाही विकत घेतला आहे. वडील त्यामध्ये होलसेल दुकान सुरू करू या म्हणताहेत. मी त्यांना दोन्ही गाळे एकत्र करून मिनी मार्केट सुरू करू या म्हणून सांगतो आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्याद्वारे गिऱ्हाइकांवर नजर ठेवणंही सोपे जाईल आणि धावपळही थोडी कमी होईल. बघू या काय होतंय ते.'' जितेंद्र स्वतःला सावरत म्हणाला.

''ठीक आहे. मी तुझ्या बाबांशी बोलतो.'' मी त्याला हसत हसत म्हणालो. माझा निरोप घेऊन तो निघून गेला. एकंदरीत तो आपल्या व्यवसायामध्ये स्वतःला गुंतवू पाहत होता, ही समाधानाची बाब होती. केवळ परिस्थितिशरण न होता त्याने मनापासून व्यवसायामध्ये समरस होणे गरजेचे होते.

जितेंद्रची ही घुसमट ऐकून मला माझ्या उमेदीच्या काळातले द्वंद्व आठवले. दादांच्या आग्रहावरून मी बी.ए.एम.एस. तर झालो होतो. डॉक्टरकीची पदवी हातात होती. पण पुढे काय करायचे ते नक्की ठरविले नव्हते. एका हॉस्पिटलमध्ये शिकाऊ डॉक्टर म्हणून नोकरी करत होतो. साहित्य क्षेत्रामध्ये आवड असल्यामुळे बहिःस्थ एम.ए. मराठीही केलं होतं. नेट-सेटची परीक्षा देऊन सरळ प्राध्यापक व्हावं, असंही कधीकधी वाटायचं. दरम्यानच्या काळात माझी नीलमशी म्हणजे माझ्या मिसेसशी भेट झाली. आम्ही लग्न करण्याचा निर्णय घेतला. विशेष म्हणजे आम्ही लग्नानंतर दोघांनी मिळून आमचा दवाखाना सुरू केला आहे. डॉक्टरकीच्या बऱ्याच गोष्टी मला माझ्या मिसेसने शिकविल्या आहेत. त्याचप्रमाणे माझी आवड ओळखून इतर उपक्रम राबविण्यासाठी मला वाव दिला. आम्ही 'संवेदना' ही आरोग्य, साहित्य व सामाजिक संस्था स्थापन केली. या संस्थेमार्फत आम्ही पहिल्याच वर्षी डॉ.गिरीश ओक यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्या कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांच्याशी झालेल्या पत्रव्यवहारातील एक प्रसंग आठवतो. मी त्यांना पत्रात असं लिहिलं होतं की, वैद्यकीय क्षेत्रात असूनही मला साहित्यक्षेत्रामध्ये विशेष आवड आहे. म्हणून हा कार्यक्रम आयोजित करत आहे वगैरे वगैरे. त्यावर पत्रोत्तरात डॉ.गिरीश ओक यांनी असे लिहिले होते की, वैद्यकीय क्षेत्रात असूनही नव्हे तर वैद्यकीय क्षेत्रात असल्यामुळेही साहित्यक्षेत्रामध्ये विशेष आवड जोपासता येईल. पुढे हळूहळू मलाही याची जाणीव होत गेली. एक डॉक्टर या नात्याने आपल्याकडे येणारा प्रत्येक रुग्ण आपण अंतर्बाह्य तपासत असतो. त्यामुळे माणूसपण आपल्याला अधिक समजू शकते. अशा प्रकारे आपला पेशा आणि आवड हे दोन्ही किती परस्परपूरक आहेत, याचा मला अनुभव येत गेला आणि या क्षेत्रामध्ये डोळसपणे काम करण्याचे भान आले. अर्थात आज जरी मी माझ्या या वाटचालीचे इथे कौतुकाने विश्लेषण करत असलो तरी काही काळ मलाही अंतर्द्वंद्व अनुभवावे लागले आहे. कदाचित बहुतेकांनाच कोणत्याही क्षेत्राची निवड करताना सुरुवातीला ते अनुभवावे लागत असावे.

रात्री मी दवाखाना बंद करण्याच्या तयारीत होतो. इतक्यात जितेंद्रने सांगितल्याप्रमाणे त्याचे वडील मला भेटायला आले. अंगात विजार-शर्ट, डोक्यावर गांधीटोपी असा पेहराव. कपाळाला गंध. त्यांचं शिक्षण बेताचेच झालं आहे. पण स्वभाव मात्र बोलका आहे.

''डॉक्टर, येऊ का? पेशंट अजून संपले का नाही?'' असं विचारत ते सरळ केबिनमध्ये आले.

''या काका. तुम्ही दुकान बंद केलं की नाही?''

''मुलगा दुकानात आहे. त्याला बंद करायला सांगून आलो आहे. त्याचे रिपोर्टस् कसे काय आहेत?''

''रिपोर्ट नॉर्मल आहेत. काळजी करण्याचे काही कारण नाही. त्या डॉक्टरांनी तुम्हांला सर्व कल्पना दिलीच असेल.''

''त्यांच्याकडे खूप गर्दी होती. त्यांना धड बोलायलाही सवड नव्हती. काही दोष नाही म्हणाले आणि औषधाची चिठ्ठी लिहून दिली. त्याला कशामुळं हा त्रास होत असेल?''

''त्याची थोडी दगदग होते आहे. तुम्ही दुकानाची वेळ थोडी कमी का करत नाही? आणि आठवड्यातून एक दिवस सुट्टीही घ्यायला पाहिजे...''

''अहो डॉक्टर, सुरुवातीच्या काळामध्ये मी सायकलला पिशव्या अडकवून घरोघरी जाऊन माल विकला आहे. चार पैसे हातात आल्यावर आठवडा बाजारात फिरते दुकान सुरू केले. त्यानंतर हा दुकानगाळा घेतला. गेली तीस-बत्तीस वर्षे मी आणि बायको मेहनत करतो आहोत. एवढं सगळं आयतं करून ठेवलं आहे. त्याला हे नुसते चालवायलाही जमू नये का?'' काका जाब विचारल्यासारखे म्हणाले. आपला व्यवसाय हा आपल्या जीवनाचा महत्त्वाचा पण एक छोटासा भाग आहे. तो सांभाळून आपल्याला इतर अनेक गोष्टींशी मैत्री जपता यायला पाहिजे, हे काकांना मी कसे समजावून सांगणार?

''तुम्ही म्हणताय ते बरोबर आहे काका. पण आता सर्व

स्थिरस्थावर झाले आहे ना? तुम्ही त्याला थोडी मोकळीक द्यायला हवी. त्याला पुढे शिकायला मिळाले नाही म्हणून तो काहीसा नाराज आहे.''

''कॉलेज शिकून तरी शेवटी काय करणार होता? दुकानच चालवायचे आहे ना? का नाटक सिनेमा करून त्याचं पोट भरणार होतं?'' काका एकदम उसळून म्हणाले, ''एकुलता एक मुलगा आहे. सोन्यासारखी बायको आहे. तुम्ही उलट त्यालाच समजावून सांगा.''

''पुढच्या वेळी तो इंजेक्शन घ्यायला आल्यावर मी त्याला समजावून सांगतो.'' मी निमूटपणे मान हालवीत म्हणालो. काकांची समजूत काढणे म्हणजे लहान तोंडी मोठा घास घेतल्यासारखी माझी अवस्था झाली होती. काका थोडे घुश्शातच निघून गेले.

अभिनय क्षेत्र हे एक आकर्षक क्षेत्र आहे. कॉलेज जीवनामध्ये ह्याची अनेकांना भुरळ पडू शकते. पण करिअरसाठी मात्र हे सर्वाधिक बेभरवशाचे क्षेत्र आहे. त्यामुळे हे क्षेत्र निवडताना बहुतेकांना आपल्या घरापासूनच संघर्षाची सुरुवात करावी लागते. या क्षेत्रामध्ये यशस्वी होण्यासाठी प्रचंड मेहनत करण्याची तयारी, निष्ठा आणि दृढता या गोष्टींची आवश्यकता असते. आपली शक्तिस्थाने आणि मर्यादा ओळखता याव्या लागतात.

अतुल कुलकर्णींना मुलाखतीमध्ये मी एक प्रश्न विचारला होता. 'झपाटलेपण ते जाणतेपण' या साधनाने प्रकाशित केलेल्या पुस्तकामध्ये त्यांचा एक लेख आहे. त्यामध्ये त्यांनी आपल्या अभिनयक्षेत्रातील वाटचालीविषयी एक किस्सा नमूद केला आहे. ते आपल्या आईला असं म्हणाले होते की, 'मला जर काही जमलं नाही तर मी ड्रायव्हर होईन. पण नाटकाच्या बसचा ड्रायव्हर होईन. दुसरं काही चालणार नाही.' हा संदर्भ देऊन मी त्यांना त्यांच्या ह्या मॅडनेसबद्दल विचारले होते. त्यावर अतुल कुलकर्णी ह्यांनी मलाच उलट प्रश्न विचारला होता की, 'मी तेव्हा असं म्हणालो होतो हे खरं आहे. पण खरोखरच ड्रायव्हर होण्याची वेळ माझ्यावर आली असती तर तुम्ही मला आज इथं मुलाखतीसाठी बोलावलं असतं का?' कोणत्याही क्षेत्रामध्ये यशस्वी होण्यासाठी माणसाजवळ मॅडनेस जरूर असायला हवा. पण तो कॅलक्युलेटेड मॅडनेस असायला हवा. आपल्याला आपल्या क्षमतांची पुरेपूर जाणीव असायला हवी. नाही तर पुढे आयुष्यभर अशी कुचंबणा अथवा फरफट सोसावी लागते. प्रत्येकाला योग्यवेळी अशी जाणीव करून देण्यामध्ये आपली शिक्षणपद्धती आणि समाज कधी यशस्वी होईल?

**डॉ. दिलीप शिंदे**
आरोग्य संवेदना, विश्रामबाग, सांगली.
Mob.: 09423267872

## साने गुरुजींच्या स्वप्नाचे सहोदर बनण्यासाठी...

साधना आर्थिकदृष्ट्या स्थिरावली आहे आणि आपले ध्येय न सोडता वाचकप्रिय बनली आहे हे कळविताना आनंद वाटतो. अशाच वेळी टप्पा येतो दर्जाचे सातत्य राखण्याचा आणि विस्तारण्याचा. यासाठी आम्ही आपणास साधना साथी बनण्याचे आवाहन करीत आहोत. या साथींच्याकडून आम्हांला पुढील स्वरूपाचे सहकार्य हवे आहे. खालीलपैकी एक अथवा अनेक बाबी आपणास शक्य असतील, त्यातील स्वत:च्या सक्रिय सहभागाबद्दल आवर्जून लिहावे.

१. साधनाचे नवे वर्गणीदार व्यक्ती व संस्था या दोन्ही पातळ्यांवर नोंदविण्याचा प्रयत्न करणे.
२. साधना प्रकाशनाची पुस्तके व्यक्तिगत वा संस्थापातळीवर वितरित करणे.
३. साधनाचा बालकुमार दिवाळी अंक अधिकाधिक शाळांत अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावा यासाठी प्रयत्न करणे.
४. साधनाच्या नेहमीच्या अंकासाठी अथवा दिवाळी अंकासाठी छोटी मोठी जाहिरात मिळविणे.
५. आपल्या गावात साधना वाचक मेळावा घेण्याची तयारी असणे.
६. वर्गणीदारांचे नूतनीकरण करणे.
७. साधनातील मजकुराबाबत स्वत:ची मते आवर्जून कळवणे. अंक अधिकाधिक समृद्ध व्हावा यासाठीच्या सूचना करणे.

यांपैकी कशालाही, केवढाही छोटा सहभाग आम्हांस मोठा व मोलाचा वाटतो.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
**डॉ. नरेंद्र दाभोलकर,** संपादक साधना
९२६ सदाशिव पेठ, बॅ. गाडगीळ रस्ता, पुणे ४११०३०. Mob. : 9423866540

मालती शं. किर्लोस्कर

# पोस्टमॉर्टम

**आदरणीय डॉक्टरसाहेब,**
**सविनय शुभेच्छा!**

आपले 'पोस्टमॉर्टम' पुस्तक अप्रतिम. ते पुन:पुन्हा वाचून त्याचा आनंद घ्यावा असे मला वाटले. इतके ते विलोभनीय आहे.

या पुस्तकातून जाणवलेले आपले अतिशय सुसंस्कृत, विनीत, कृतज्ञ व समाजहितैषी व्यक्तिमत्त्व फार सुखद आहे. फार दुर्मिळ आहे. म्हणूनच बहुमोलही. त्याला नाटक, संगीत, खेळ, वक्तृत्व अशा ललित कलांची जोड मिळाल्याने त्या व्यक्तिमत्त्वाला इंद्रधनूचे सौंदर्य प्राप्त झाले आहे. पुस्तक वाचताना माझ्या मनात पुन:पुन्हा येत होते की आपण केवळ एक जागतिक कीर्ती लाभलेले निष्णात 'सर्जन'च आहात असे नसून, एक फार थोर 'माणूस'ही आहात. 'माणूस'पणाचा जाणूनबुजून उल्लेख करते, कारण आजच्या बाजारू आणि व्यवहारी जगात 'अरे, मानसा, मानसा, कधी व्हशील रे माणूस?' असे म्हणण्याचीच वेळ आली आहे. (आपल्या या माणूसपणाने) वाचकाला पुस्तक वाचताना 'ज्याच्याजवळ नि:संकोच मनाने आपले सुख-दु:ख बोलावे' असा विश्वासू व स्निग्ध वृत्तीचा मित्र लाभल्याचा आनंद होतो.

आपण आपले 'सर्जन'चे काम जितक्या तळमळीने, एकाग्रतेने व कौशल्याने करता तेवढ्याच तळमळीने, एकाग्रतेने व कौशल्याने आपण हे सृजनाचेही काम विलक्षण प्रभावीपणे केले आहे. प्रज्ञा-प्रतिभेचा दुर्मिळ व हृदयंगम संगम या पुस्तकात पाहावयास मिळाला.

आपण आपल्या विद्यार्थ्यांचे केवळ शिक्षकच नसून त्यांचे सन्मित्र, सल्लागार, संरक्षक व अचूक मार्गदर्शकही आहात म्हणून आज सेवानिवृत्तीनंतरही त्यांना आपला सल्ला हवासा वाटतो, आपल्याला आवर्जून भेटावेसे वाटते. हे सद्‌भाग्य किती शिक्षकांच्या वाट्याला येत असेल? मी स्वत:ही एक शिक्षक असल्याने माझे मन वाचताना आनंदाभिमानाने भरून आले. आपल्यासारखे असे शिक्षक लाभणारे विद्यार्थी नशिबवानच म्हणावेत.

आपल्या 'धन्वंतरी' मात्या-पित्यांची आपण रेखाटलेली व्यक्तिचित्रे मनात रेंगाळत राहतात. आपल्या शिक्षकांबद्दल, मग ते भारतातील असोत वा परदेशांतील असोत, हीच जिव्हाळ्याची भावना आपण वेळोवेळी व्यक्त केली आहे. ज्याचे श्रेय त्याला देण्यात आपल्या मनाने कंजूषपणा केलेला नाही, हा स्वभावविशेषही मला महत्त्वाचा व मोलाचा वाटला.

आता पुस्तकाच्या अंतरंगासंबंधी थोडे लिहिते- आपल्या पुस्तकाची छोटीशी व भावपूर्ण अर्पणपत्रिका आपल्या एकूण जीवनदृष्टीवरच प्रकाश टाकते. तिची मला राहून-राहून आठवण येते, इतकी ती माझ्या मनाला भिडली आहे.

पुस्तकाची रचना विषयवार वर्गीकरण करून नेटकी, नीटस, रेखीव अशी केली आहे. एका फुलातून दुसरे फूल उमलावे तशी पुस्तकाची आखणी झाली असल्याने विषयाचा ओघ खंडित होत नाही. उलट वाचकाची जिज्ञासा व उत्सुकताही वाढत जाते. रचनासौष्ठवामुळे विषय शास्त्रीय असला तरी नीरस, रूक्ष वाटत नाही. आपल्या व्यवसायात आज आढळणाऱ्या अपप्रवृत्ती, भ्रष्टाचार व अशाच अनेक विषयांचा विस्तृत परामर्श आपण घेतला आहे. आपण केलेले सर्व विवेचन, विश्लेषण, चिंतन आपल्या सखोल व सूक्ष्म अभ्यासाचे 'गोमटे फळ' आहे. वाचकांच्या भावनांना आवाहन करतानाच त्यांना अंतर्मुख करायचे, जागे करायचे, सावध करायचे, हे काम सोपे थोडेच आहे! आपण ते अतिशय यशस्वीपणे केले आहे.

आपले सर्व लेखन विपुल, समृद्ध अनुभवांवर आधारलेले आहे. हा जणू या पुस्तकाचा बळकट कणाच आहे. हे अनुभवसिद्ध लेखन 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी' असे आंतरिक उत्कट कळकळीने आविष्कृत झाले आहे. त्याचा आनंद एक आगळाच आहे.

पुस्तक लिहिताना एक ताजेपण वाचकाला जाणवत असते. त्याचे कारण आपल्या साऱ्या लेखनात एक सहजता आहे. आपली भूमिका आक्रमक नाही. प्रचारकाचा ऊरबडवेपणा नाही. कुणावर अकारण टीकास्त्र सोडले नाही की आत्मप्रसिद्धीची हाव नाही. स्वत:च्या व्यावसायिक जीवनप्रवासाचे प्रांजळ दर्शन घडवावे एवढीच आपली तळमळ आहे. हे खरेच असले तरी चुकीला, दोषाला, चूक वा दोष म्हणताना आपली लेखणी निर्भयपणे, ठामपणे उभी आहे. तिला पक्षपाताचा कलंक लागलेला नाही. ही सारी एक तारेवरची कसरतच आहे. त्या परीक्षेतही आपण उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाला आहात.

पुस्तकाचे स्वरूप आपण प्रश्नोत्तरांचे ठेवलेत आणि सुनीतीबाईंनी आपल्याला मार्मिक, नेमके व समाजातील अनेक विचारी लोकांच्या मनात येणारे प्रश्न विचारले आहेत. आपल्याला छान बोलते केले आहे. त्यांना खास अभिनंदन केल्याचे कृपया सांगावे. या संवादपद्धतीमुळे लेखनाला एक घरगुती आपुलकी लाभली आहे आणि त्याच वेळी वाचकाच्या ज्ञानात खूप नवी भर पडली आहे.

पुस्तकात अनेक अनुभव, आठवणी, उदाहरणे दिली आहेत. इथल्या व परदेशस्थ डॉक्टरांचे उल्लेख व वचने दिली आहेत. रुग्णांच्या व्यथांचे डॉक्टरांना येणारे भलेबुरे अनुभव, चित्रमय प्रसंग वाचताना कधी मन गोठते तर कधी डोळे वाहू लागतात, कधी या व्यवसायाला आलेले 'धंद्याचे' स्वरूप आपल्या कर्तव्यनिष्ठ मनाला

व्यथित करते. वर्तमानकाळातील या व्यवसायाला आलेल्या स्वरूपाची भूतकाळाशी वारंवार तुलना केली आहे. पण लेखक आशावादी दृष्टीने भविष्याकडे पाहतो आहे, कारण 'रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल' अशी त्याची भावना दिसते. आपल्या व्यवसायातल्या (भूतकाळातल्या) उणिवाही आपण प्रांजळपणे मान्य केल्या आहेत. बदललेल्या परिस्थितीची कारणमीमांसाही केली आहे. आपण 'सर्जन' आहोत तेव्हा कापाकापी करायची ती रुग्णाच्या भल्यासाठीच, हीच आपली वृत्ती आपल्या लेखणीतही उतरली आहे.

'फॅमिली डॉक्टर', 'दयामरण' या विषयांवरचे आपले चिंतन बहुमोल आहे.

खरं सांगू, आपले हे पुस्तक वाचताना मला मनापासून वाटत राहिले की, बारावी (विज्ञान)च्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात या पुस्तकाचा क्रमिक पुस्तकाप्रमाणे अंतर्भाव होणे फार जरुरीचे आहे. ज्या क्षेत्रात आपण आयुष्यभराच्या कार्यासाठी पाऊल टाकणार ते क्षेत्र कसे आहे, त्यातील आपली कर्तव्ये कोणती, जबाबदाऱ्या कोणत्या, रुग्णाकडे पाहण्याची दृष्टी कशी निरामय व विशुद्ध हवी या व अशाच अनेक महत्त्वाच्या गोष्टींकडे पाहण्याची एक अत्यावश्यक अशी दृष्टी त्यांना यातून मिळेल.

एखाद्या मधुर भजनाचे ध्रुपद फार वेळा आळवले तरी गोड लागते, तसे रुग्ण व त्याचा जीव वाचवणे, त्यासाठी त्यांच्याशी सतत आपलेपणाने संवाद साधणे हे आपल्या पुस्तकाचे अविस्मरणीय ध्रुपद आहे. ते जो आळवील त्याला यश निःसंशय मिळणारच.

या पुस्तकाने मराठी वाङ्मयात निःसंशय मोलाची व फार मोठी भर घातली आहे. हे पुस्तक घरोघरी वाचले जावे, पुनःपुन्हा वाचले जावे ही माझी कळकळीची अपेक्षा. शासनाने या गुणी पुस्तकाचा यथोचित सन्मान करावा ही हजारो वाचकांप्रमाणेच माझीही इच्छा.

आमच्या घटप्रभेच्या कर्नाटक आरोग्यधामांचे ब्रीदवाक्य 'रुग्ण हाच देव' असे आहे. त्या ब्रीदाचे शंभर टक्के आचरण करणाऱ्या आपल्यासारख्या थोर, बुद्धिमान धन्वंतऱ्याला परमेश्वराने उदंड आयुष्य द्यावे.

पुस्तक वाचताना मनात आले, या सज्जन धन्वंतऱ्याचा सहकारी, विद्यार्थी, निदान रुग्ण तरी होण्याची संधी आपल्याला मिळायला हवी होती; म्हणजे आपले जीवन कितीतरी अनुभवांनी व अर्थांनी श्रीमंत झाले असते.

आपल्या विचारांच्या मांडणीत एक लक्षवेधक चिरेबंदपणा आणि शिस्त आहे. पाल्हाळ, फापटपसाऱ्यांना पूर्ण रजा. विवेचन तर्कशुद्ध, न चुकता आपल्याला विचारलेल्या प्रश्नाच्या मुळाशी प्रथम जायचे. मग टप्प्याटप्प्याने प्रश्नांतर्गत सर्व उपप्रश्नांचा, आक्षेपांचा, इष्टानिष्टतेचा विचार करायचा व आपले मत-निर्णायक-सांगायचे. त्यासाठी आवश्यक तेथे देशी-विदेशी ग्रंथांचा, ग्रंथकारांच्या विचारांचा, अर्थपूर्ण सुभाषितांचा वापर करायचा, आपल्या उदंड अभ्यासाचे, सखोल चिंतन- मननाचे अवलोकन, अभ्यास, अनुभव यांचे भक्कम पाठबळ मदतीला असतेच. सर्व सुस्पष्ट, स्वच्छ आणि लखलखीत. या साऱ्यांमुळे वाचकाच्या विचारांना एक वळण मिळते. त्याची विचारशक्ती सबळ होते.

आपण प्रस्तावनेत 'फटकळपणाचा' उल्लेख केला आहे. त्याबाबत मला असे वाटते की, समाजाच्या हिताचे, पण नाना कारणांनी त्याला अप्रिय सत्य सांगणाऱ्यांना प्रसंगी फटकळ व्हावेच लागते. (औषध रुग्णाच्या कल्याणासाठी दिलेले, पण ते घेताना तो सामान्यतः तोंड वाकडेच करतो). सॉक्रेटिसापासून आगरकरांपर्यंत कितीतरी विचारवंतांना प्रसंगी फटकळ व्हावे लागले आहे, हे आपण वाचतोच!

आपल्या पुस्तकाचे शीर्षक यथोचित आहे. पण त्याबाबत मला एक जाणवले ते आपल्याला मोकळेपणाने सांगते. 'पोस्टमॉर्टम' म्हणजे शवविच्छेदन असा अर्थ आहे. माझ्या मते ते काम करणारा माणूस सामान्यतः भावबधिर असतो. त्याला रुग्णाच्या सर्व शरीरांतील सर्व घटकांचे साक्षात दर्शन घडते हे खरे. आपले लेखन प्रसंगी कठोर व जळजळीत असले तरी जो विषय आपण मांडत आहात त्यासाठी ते आवश्यकच आहे. पण आपले मन भावना समजून घेणारे व सहृदय आहे.

आपण एकंदरीच वैद्यकीय व्यवसायाचे आज झालेले विद्रूपीकरण, त्यात आलेली बाजारू दृष्टी (पैसा व झटपट प्रसिद्धीची हाव), त्यात घुसलेल्या अपप्रवृत्ती यांचे प्रभावीपणे पोस्टमॉर्टम केले आहे हे मात्र निःसंशय खरे आहे. आपल्यासारख्या 'व्रतस्थ' धन्वंतऱ्याने ते केले हे उत्तम झाले. समाजाने त्यासाठी उपकृत रहायला हवे.

देवाखालोखाल सामान्यपणे माणूस 'डॉक्टर'ना मानतो. त्यांना देव वा देवदूत समजतो ते काय उगीच? हजारो रुग्णांना जणू तो पुनर्जन्मच देत असतो. रोगमुक्त होऊन प्रसन्न व आनंदी चेहऱ्याने माणूस घरी जातो त्यावेळी त्याच्या हास्याने डॉक्टरांचे सर्व परिश्रम सफल होतात. त्या हास्याने डॉक्टरला होणारा आनंद लाखो रुपयांपेक्षा कितीतरी मोठा असतो, मौल्यवान असतो. यातच वैद्यकीय व्यवसायाची अद्वितीय थोरवी साठवलेली आहे. नाही का? आपण आपल्या या व्यवसायात फार मोठे यश मिळवलेत. ते ऐकताना मन आदराने विनम्र होते. अनेक क्षेत्रांतील थोर मंडळी व स्नेहीजन आपण मिळविलेत, गुणीजनांचा संग्रह केलात. आणखी काय मिळवायचे माणसाने? सर्व शुभेच्छा व अभीष्टचिंतन.

*(डॉ. रवी बापट यांचे 'पोस्टमॉर्टम' हे मनोविकास प्रकाशनाने प्रकाशित केलेले पुस्तक वाचून मालतीबाई किर्लोस्कर यांनी लिहिलेले पत्र- त्यातील हृदगत लक्षात घेऊन प्रसिद्ध करणे औचित्यपूर्ण वाटते. - संपादक)*

## ‘तारांगण’मध्ये तो लेख समाविष्ट करावा

सुरेश द्वादशीवार यांच्याशी माझा स्नेह १९८१ पासून आणि तोही विविधांगी. विदर्भ साहित्य संघात आम्ही सोबत होतो. ते चंद्रपुरात आणि मी नागपुरात एकाच वेळी वार्ताहर होतो. ‘लोकसत्ता’ची नागपूर आवृत्ती सुरू झाल्यावर ते माझे बॉस झाले, पुढे त्यांच्या जागी मी संपादक झाल्यावर आम्ही पदाच्या बाबतीत समान पातळीवर आलो. अनेकदा आम्ही व्यासपीठावर सोबत वावरलो. अनेकदा एकाच व्यासपीठावरून काही विषयांवर प्रतिस्पर्धी म्हणूनही वावरलो. असे स्नेहाचे विविध पदर असले तरी नरहर कुरुंदकर हाच आमच्या स्नेहाचा गाभा आणि आधारही राहिला. द्वादशीवार नावाच्या माणसातली दिलदारी आणि उमदेपण लोभस आहे, त्या संदर्भात एकदा सविस्तर लिहायला हवेच. ‘तारांगण’ वाचताना हे सर्व आठवले. स्नेहाच्या इतक्या प्रदीर्घ कालखंडात ‘तारांगण’मधील अनेकजण शब्दबद्ध होण्याआधी द्वादशीवार यांच्याकडून ऐकण्याचा योग अनेकदा मला आलेला आहे. यांतील काहींचा पहिला खर्डा वाचण्याची संधी मला मिळाली आहे. ‘साधना’त प्रकाशित होतानाही हा सर्व मजकूर मी जीव लावून वाचला आहे आणि आता तो पुस्तक म्हणून वाचताना द्वादशीवार यांचा प्रातिभ आवाका पुन्हा एकदा स्पष्ट झाला.

पत्रकार द्वादशीवार यांनी लेखक द्वादशीवार यांना नेहमीच ‘डॉमिनेट’ केले, ही माझी यापूर्वी केलेली तक्रार पुन्हा एकदा ‘तारांगण’ वाचताना आठवली. सुरेश द्वादशीवार यांनी त्यांच्या आईवर लिहिलेला मजकूर वाचला की मी म्हणतो याची प्रचिती येईल. (अकाली दिवंगत अभिनेत्री स्मिता पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ज्येष्ठ सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यकर्ते गिरीश गांधी एक विशेषांक दरवर्षी प्रकाशित करतात. या वर्षीच्या अंकाचे संपादन मी केले आहे आणि या अंकात ‘नलिनी जनार्दन’ हा द्वादशीवार यांचा लेख प्रकाशित झालेला आहे. अतिआग्रहानंतर हा लेख अखेर द्वादशीवार यांनी लिहिला आणि माझा हट्ट पुरवला.) द्वादशीवार यांच्या लेखनाचा एक हळवस्पर्शी पैलू या लेखातून आपल्याला भेटतो. असं हे हळवं, त्याचवेळी एक स्त्री म्हणून आईविषयी अलिप्तपणे लिहिताना ते अनेकदा आपल्याला लुब्धस्तंभितच करतात आणि आपले प्राण कंठाशी येतात इतकी ताकद त्या लेखनात आहे. लेखक द्वादशीवार यांच्या लेखनाची दखल घेताना यापुढे हा लेख ओलांडून पुढे जाताच येणार नाही. हा लेख ‘तारांगण’मध्ये समाविष्ट व्हायला हवा होताच. जरी ‘तारांगण’ द्वादशीवार यांनी आईला अर्पण केले असले तरी. पुढच्या आवृत्तीत हा लेख समाविष्ट करावा असा माझा आग्रह आहे.

**प्रवीण बर्दापूरकर**, नागपूर

## चाकोरीबाहेरचे विजयकुमार सिंघल

२५ फेब्रुवारी २०१२ राच्या साधनातील ‘लोकहितासाठी चाकोरीच्या बाहेर जा’ हा दि.मा.मोरे यांनी लिहिलेला लेख वाचला. कुठलाही सरकारी अधिकारी (बहुधा वरिष्ठ पदावरील) जर थोड्याही सामाजिक जाणिवेने वागला तर काय परिवर्तन घडू शकते हे त्या लेखात उल्लेख केलेले अधिकारी आणि त्यांच्या चाकोरीबाहेरील कामामुळे लक्षात येते.

लेखातील एका उदाहरणात २००५ या वर्षातल्या नदीजोड प्रकल्पाचा उल्लेख केला आहे. त्यात जळगावचे तत्कालीन जिल्हाधिकारी भास्कर मुंडे असे म्हटले आहे. परंतु भास्कर मुंढे (मुंडे नव्हे) कधीही जळगावचे जिल्हाधिकारी नव्हते. ते जळगावलगतच्या धुळे जिल्ह्याचे जून २००४ ते सप्टेंबर २००७ दरम्यान जिल्हाधिकारी होते. श्री.मुंढे यांनीसुद्धा धुळे जिल्ह्यामध्ये नदीजोड प्रकल्पाचे उल्लेखनीय काम त्या दरम्यान केले होते. त्याबाबत नुकतेच त्यांचे ‘नदीजोड प्रकल्प’ हे पुस्तक महाराष्ट्राचे मुख्य सचिव रत्नाकर गायकवाड यांच्या हस्ते प्रकाशित झाले आहे.

महत्त्वाचे म्हणजे मोरे यांच्या लेखात जळगाव जिल्ह्यातील नदीजोड प्रकल्पाचा उल्लेख असून २००५ मध्ये जळगावचे तत्कालीन जिल्हाधिकारी श्री.विजयकुमार सिंघल यांनीसुद्धा चाकोरीच्या बाहेर जाऊन आपल्यातील स्थापत्य अभियंता जळगाव जिल्ह्यातील नदीजोड प्रकल्पाच्या कामात दाखवून दिला. हा प्रकल्प प्रामुख्याने गिरणा नदी धारण क्षेत्रात केला. जळगाव जिल्ह्यातील लोकांना ज्या नद्या-नाल्यांना पूर कधी दिसले नाहीत, त्या जिल्ह्यात नदीजोड प्रकल्पामुळे उपलब्ध होणाऱ्या पाण्यामुळे ७०० मध्यम व लघुप्रकल्प, कोल्हापूर बंधारे, पाझर तलाव, गावतलावांचे पुनर्भरण करण्यासोबतच जवळपास १६००० विहिरी रिचार्ज झाल्यात. या दरम्यान पाऊस तर कमी झाला (आकडेवारी उपलब्ध आहे) परंतु नद्या, नाले, तलाव मोठ्या प्रमाणावर भरलेत. यावरून जळगाव जिल्ह्यातील नद्याजोड प्रकल्पाची यशस्विता स्पष्ट दिसते. जळगावात या

प्रकल्पाचा मोठा लाभ झाला असल्याने हा प्रकल्प राज्यातच नव्हे तर देशात आणि परदेशातसुद्धा नावारूपास आला.

या प्रकल्पासाठी चाकोरीच्या बाहेर जाऊन काम केल्याबद्दल श्री.विजयकुमार सिंघल यांना २०१० मध्ये 'पंतप्रधान श्रेष्ठत्व पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. त्या आधी २००६ मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर ऑस्ट्रेलियामध्ये झालेल्या 'जागतिक नदी महोत्सवात' या प्रकल्पाचे सादरीकरण श्री.सिंघल यांनी केले होते. सदर परिषदेसाठी त्यांना ऑस्ट्रेलियन सरकारने बोलावले होते. राष्ट्रीय स्तरावरसुद्धा राजस्थान सरकारने त्यांना या प्रकल्पाच्या सादरीकरणासाठी विशेष निमंत्रित केले होते. तर महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख आणि तत्कालीन जलसंपदा मंत्री अजितदादा पवार यांनी 'मॉडेल प्रोजेक्ट' म्हणून सदर प्रकल्प राबवण्याचे जाहीर केले होते.

**सुधीर निंबाळकर,** ठाणे

## नऊ वर्षांचा गुलाब

गाव तसे आडवळणाचे. जाण्या-येण्यासाठी फाट्यावरून तेव्हा एक-दीड किलोमीटर पायीच जावे लागे, म्हणूनच की काय तेथील मराठी शाळेत बदली करून जाणारे शिक्षक दुर्मिळ असत. शाळा आणि गाव डोंगराच्या कुशीत वसलेलं. साऱ्या गावची जमीन दगडी होती.

मला हजर होऊन दोन वर्षे संपलेली आणि तिसरं सुरू झालेलं. मी मात्र खूष. शाळा दोन खोल्यांत भरत असे. वर्गखोल्या तशा पडक्या पण भावी नागरिक त्यांत घडत होते.

गावातील लोक प्रेमळ व उद्योगी होते. शिक्षणप्रेमी नव्हते, परंतु शिक्षणाविषयी अल्पशी आस्था बाळगून होते. गावच्या वैभवात भर घालणारं धरणही वेशीवर आपली प्रतिमा टिकवून होतं. ते दरवर्षी तुडुंब भरायचं, लोकांच्या मनासारखं.

वर्ग माझा चौथीचा आणि ते वर्ष होतं १९९८. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होऊन महिना लोटला. जुलैला सुरुवात झाली. वर्गातील सर्वच मुलं चुणचुणीत होती. सुरुवातीपासून माझ्याकडं होती.

ते दिवस म्हणजे पावसाळ्याचे. दोन-तीन दिवसांपूर्वी वारा व वादळासह पाऊस झालेला. त्या दिवसापासून गाव अंधारात. विजेशिवाय गावाचे व्यवहार कसेबसे सुरूच. गाव आपल्या जिल्ह्यातील पारोळा तालुक्याच्या सीमेवर वसलेलं. त्याचं नाव 'दगडी सबगव्हाण'. नावाप्रमाणेच गुणवैशिष्ट्यं असलेलं.

माझ्या वर्गात एक गुलाब होता. नऊ वर्षांचा, भिल्ल जमातीत जन्माला आलेला. चेहऱ्यावरून कोणालाही दया यावी असा. अभ्यासातही चांगला आणि नियमित असा निरागस गुलाब.

गुलाब आत्याकडे शिकायला आलेला. त्याचं कारणही असंच काही होतं. आत्या पायांनी पंगू व डोळ्यांनी अधू होती. दार नसलेल्या, सच्छिद्र, मोडकळीस आलेली अशा झोपडीत गुलाब आत्यासोबत राहत असे, अगदी हुबेहूब तुकडोजींची झोपडी. आत्या गावात, वाकून, काठीच्या आधाराने, रस्त्यावरून अंदाजे जात असे. कारण गुलाब शाळेत असायचा.

तीन दिवसांपासून गावात वीज नाही, शाळा आपली नेहमीप्रमाणे सुरू आहे आणि वर्गात शिकवणंही. गावातील लोकांची विजेविषयी कुरबूर वर्गात ऐकायला यायची. त्यात उलटसुलट चर्चा आणि वीज मंडळाला शिव्याशापही. आमचं काही विजेवाचून अडत नव्हतं, म्हणून वर्गाचं कामकाज सुरूच होतं.

अचानक वर्गाच्या पुढ्यात आत्या येऊन उभी- गुरुजी! गुरुजी!! गुरुजी!!! वाकून काठीचा आधार घेत क्षीण आवाजात बोलवले. कामात गुंग होतो म्हणून उशिरा ऐकू आलं, पाहिलं तर गुलाबची आत्या. जवळ गेल्यावर आत्या अहिराणी बोलीभाषेत म्हणाली,

'गुरुजी, मना भासाले धाडी द्या'. मी आपला नेहमीच्या शिस्तीप्रमाणे संतापानेच म्हणालो, 'तो अभ्यास करतोय. आत्ताच येणार नाही.' यावर आत्या म्हणते- 'गुरुजी मनं घरमा तीन दिनांपासून पीठ नहीसे, तेले पयासखेडाले (पळसखेडे) दयाले धाडनंसे.'

या वाक्यानं माझं मन हेलावून गेलं आणि गहिवरलो... डोळ्यांतले अश्रू आवरू शकलो नाही. डबडबलेल्या डोळ्यांनी मी गुलाबला जायला परवानगी दिली. ''दोन-तीन दिवस उपाशीतापाशी असल्यावरही माझा विद्यार्थी गैरहजर नव्हता.'' या विचाराने मी आनंदलो. परंतु पोटात अन्न नाही, आत्याच्या व गुलाबच्या, याचं दुःख वाटलं.'

माझ्यासाठी एक अविस्मरणीय क्षण आणि त्यासोबत एक संदेश गुलाबनं इतरांसाठी दिला. ''शिकण्याची आवड असेल तर भूकसुद्धा... शिक्षणाच्या आड येऊ शकत नाही.''

**विलास पंडित महाजन,** धरणगाव, जि.जळगाव

# दत्ता ताम्हणे : शंभरीत पदार्पण



समाजवादी चळवळीचे अस्सल बावनकशी मूर्तिमंत रूप म्हणजे दत्ताजी ताम्हणे, १३ एप्रिलला त्यांनी वयाची ९९ वर्षे पूर्ण करून १०० व्या वर्षात पाऊल टाकले.

'पुढच्या पिढ्या विस्मयाने विचारतील, खरेच हाडामासाचा असा माणूस या जगात झाला होता? हे जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ आइन्स्टाईनचे म.गांधी यांच्याबद्दलचे उद्गार विख्यात आहेत. पण आपापल्या ठिकाणी आपले छोटे पाय रोवून याच दिशेने वाटचाल करणारे तपस्वी हे अशा समाजवादी चळवळीचे मोठेच बळ होते. दत्ताजी ताम्हणे हे अग्रदलात येतात. १९५७ ते १९६२ विधानसभेत आणि १९६८ ते १९७४ विधानपरिषदेत ते आमदार होते. आमदार झाल्या झाल्या हातात अर्थसंकल्प आला. दत्ताजी त्याबाबत पूर्ण निरक्षर होते. त्यांनी थेट डॉ.धनंजयराव गाडगीळांना पत्र टाकले. पुणे गाठले. अर्थसंकल्प कसा वाचावा हे शिकून घेतले आणि त्यांच्या भाषेत 'नव्या आमदारांना त्याबाबत मार्गदर्शन करण्याऐवढे ते तरबेज झाले.' लोकसभेत नाथ पै, मधु दंडवते, मधु लिमये यांची भाषणे सत्तारूढ पक्षनेतेही लक्ष देऊन ऐकत. हेच स्थान आपल्या कर्तृत्वाने आणि समर्पणाने दत्ताजींनी महाराष्ट्र विधिमंडळात मिळवले होते. त्यांच्या संपूर्ण जीवनावर म.गांधी, साने गुरुजी, एस.एम.जोशी, नानासाहेब गोरे यांचा स्पष्ट ठसा आहे. ग.प्र.प्रधानसर हे त्यांचे जिवाभावाचे मित्र. ठाणे जिल्ह्यातील राजकीय जागृती, मासवण (ता.पालघर) येथील आदिवासी भागातील विधायक कामे, ठाणे जिल्ह्यात आजही राष्ट्र सेवादलाचा असलेला प्रभाव आणि संघटन या सर्व बाबी थेटपणे दत्ताजींच्या कार्यकुशलतेशी आणि प्रभावाशी येऊन भिडतात. अर्थात त्यांचे खंदे साथीदार नवनीतभाई शहा यांचाही यामध्ये मोलाचा सहभाग आहे.

दत्ताजींची आमदारकी संपूनही आता उणीपुरी चाळीस वर्षे झाली, पण आजही सर्व पक्षांत त्यांना आदराचे स्थान आहे. पक्षाचे खंदे सैनिक असूनही पक्षापलीकडे समाजातील सर्व थरांत, विरोधकांतही व्यापक मान्यता मिळवणे ही बाब आज अशक्य वाटावी अशी आहे. दत्ताजींच्या सारखे लखलखीत निष्कलंक सार्वजनिक व राजकीय चारित्र्य असल्याशिवाय अशी मान्यता लाभत नाही. लाभली तरी आयुष्यभर टिकत नाही. १९७८ साली दत्ताजींचे मोठे बंधू अण्णा यांनी वाचन मंडळ चालू केले. १९९९ साली त्यांचे निधन झाले. त्यानंतर वाचन मंडळ चालू ठेवण्याचे काम दत्ताजींनी स्वत:कडे घेतले. आजही या वाचन मंडळात अत्यंत नियमितपणे दररोज दत्ताजी येतात. पुढे तिथेच थांबतात. तिथे कितीतरी मंडळी भेटायला, म्हणजे दत्ताजीचे दर्शन घ्यायला, येत असतात. त्यांना ते आनंदाने भेटतात. या सगळ्याचा अर्थ दत्ताजी या वयातही शारीरिकदृष्ट्या स्वतंत्र व स्वावलंबी आहेत असा होतो आणि तो तसाच आहे. वयपरत्वे ऐकू कमी येते. जुनी स्मृती काही वेळा दगा देते. पण वृत्ती उमेदीची आहे. वाढदिवसाचा विषय निघाला की दत्ताजी म्हणतात, 'काय घाई आहे? थोडं थांबा. १०० वर्षे पुरी होऊ द्यात. मगच वाढदिवस करू.'

एका बाजूला निरिच्छपणा, दुसऱ्या बाजूला अखंड आशावाद ही दत्ताजींच्या पिढीवर महात्मा गांधी यांनी केलेल्या गारुडाची खूण आहे. दत्ताजी म.गांधींच्या आश्रमात दाखल झाले. पहिल्याच महिन्यात शौचकूप साफ करणे, मैला उचलणे, तो दूर नेऊन सोनखत होण्यासाठी गाडणे हे काम त्यांच्याकडे आले. दत्ताजी म्हणतात, 'मीपणा व अहंभाव यामधून मी या कामामुळे कायमचा मुक्त झालो' आणि आयुष्यभर ते परनिंदा, प्रौढी, आत्मस्तुती यापासून दूरच राहिले. स्वातंत्र्यलढ्यातील तुरुंगातील व अन्य अनुभवांबद्दल ते बोलतात पण हा 'मी' त्यात जवळजवळ नसतोच.

सध्याच्या देशकालमानाची रास्त चिंता अनेकांना वाटते. पण चांगले तेच रुजेल, भविष्यकाळ फुलेल या विचारावर दत्ताजी ठाम आहेत. मग अर्थातच आपल्यालाही निराशावादी बनण्याचा हक्कच राहत नाही, जीवेत् शरद: शतम् याच्या उंबरठ्यावर दत्ताजी उभे आहेत. म.गांधींना १२५ वर्षे जगण्याची उमेद होती. दत्ताजी दमदारपणे त्या वाटेवार चालत आहेत. त्यासाठी समस्त साधना परिवाराच्या शुभेच्छा.

✷

# प्रत्येक व्यक्तीच 'गृहस्वप्न' पूर्ण करण्यासाठी
# वास्तूसिध्दी कर्ज योजना



सारस्वत बँक
वास्तू सिद्धी
होम लोन

- ₹ ५० लाखापर्यंत कर्ज
- परतफेडीची मुदत - १५ वर्ष
- रास्त व्याजदर
- फिक्स्ड किंवा फ्लोटींग व्याजदराचे पर्याय उपलब्ध

*अटी लागू

सारस्वत बँक

दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेडयल्ड बँक)

**पुणे झोन - ८/३, एरंडवणा, कर्वे रोड, नळ स्टॉप जवळ, पुणे ४११ ००४.**

Website: www.saraswatbank.com e-mail: customerservicecentre@saraswatbank.com

साधना साप्ताहिक :
२८ एप्रिल २०१२

एन.डी.नं. आर.एन.आय.१६०१/५७
रजि.क्र. एल-२/आर.एन.पी./पी.एन.सी.डब्ल्यू./डब्ल्यू-१७८/२०१२-२०१४

दीड महिन्यात
पहिली आवृत्ती संपली!
दुसरी आवृत्ती आली...




पृष्ठे २२० । किंमत रुपये २००

# तारांगण

सुरेश द्वादशीवार

अनंत भालेराव
यदुनाथ थत्ते
नरहर कुरुंदकर
जर्नेलसिंग भिन्द्रानवाले
सुरेश भट
तारकेश्वरी सिन्हा
एम एफ हुसेन
पंडित विष्णुदत्त शर्मा
बाबा आमटे
दादासाहेब कन्नमवार
राम शेवाळकर
सविता डेका
चौधरी चरणसिंग
राजे विश्वेश्वरराव
प्रमोद महाजन
जनार्दन पांडुरंग

ही केवळ व्यक्तिचित्रे नाहीत, अनेक प्रश्नांची उत्तरे देणारी आणि अगोदर हाती आलेल्या काही उत्तरांविषयी संशय उत्पन्न करणारी चित्रणे आहेत. यातील काही व्यक्तिरेखांची महाराष्ट्राला ओळख नाही, काहींची ओळख अपुरी तर काहींची ओळख गैरसमजांनी झाकोळलेली आहे.

संपर्क : साधना प्रकाशन, ४३१ शनिवार पेठ,
पुणे ४११०३० फोन : ०२०-२४४५९६३५

तीन वर्षांपूर्वी
प्रकाशित झालेले पुस्तक
तिसरी आवृत्ती आली




पृष्ठे २५६ । किंमत रुपये २५०

# नोकरशाईचे रंग

ज्ञानेश्वर मुळे

गेली २५ वर्षे भारतीय विदेश सेवेत कार्यरत असलेल्या
आणि सध्या 'मालदीव'मध्ये
भारताचे उच्चायुक्त असलेल्या ज्ञानेश्वर मुळे यांनी
टोकियो, दिल्ली, मॉस्को येथे काम करताना आणि
तेथील समाजजीवनाशी समरसून जगताना
आलेल्या अनुभवांचे व चिंतनाचे शब्दरूप

संपर्क : साधना प्रकाशन, ४३१ शनिवार पेठ,
पुणे ४११०३० फोन : ०२०-२४४५९६३५